
# माणूस

शनिवार । १९ ऑगस्ट १९७८ । १ रुपया

## नोकरदार, स्वतंत्र व्यावसायिक, महिला, विद्यार्थी, मजूर....

## जनमत कौल



जनमत कौल पत्रिकांची प्राथमिक छाननी. स्थळ : माणूस कार्यालय.
डावीकडून : सतीश कामत, सतीश जकातदार, विनय हर्डीकर, जयदेव डोळे, प्रदीप आपटे, शेखर केळकर व मुकुंद संगोराम.

# प्राप्तीकर कायद्यातील अलीकडच्या काळातील फेरबदल - २
# घोड्यांच्या शर्यतीत बक्षिसाच्या रकमेतून
## प्रारंभीच करकपात.

घोड्यांच्या शर्यतीत, बुकमेकर्स अथवा रेसक्लब जी बक्षिसाची रक्कम देतात, त्या रकमेतून १ जून १९७८ पासून अगोदरच करकपात करणे जरूर आहे.

घोड्यांच्या शर्यतीत बक्षिसाची रक्कम देण्याची जर आपली जबाबदारी असेल तर प्राप्तीकर-कायद्याप्रमाणे खालील जबाबदारी आपणावर आहे.

- भारतातील नागरिक अशा इसमास, जेव्हा आपण रु. २५००० पेक्षा अधिक बक्षिसाची रक्कम देतो तेव्हा ३४·५ टक्के कर ( ३० टक्के प्राप्तीकर आणि ४·५ टक्के सरचार्ज ) रक्कम देताना
- ज्या तारखेला करकपात केली असेल त्या तारखेपासून एक आठवड्याच्या आत ही रक्कम, सरकारच्या खात्यात जमा करा. रिझर्व बँक ऑफ इंडियाचे अथवा स्टेट बँक ऑफ इंडियाचे कोणतेही कार्यालय अथवा सरकारी व्यवहार करणाऱ्या त्यांच्या उपबँका अथवा निवडक केंद्रांत ज्यांना कर-रक्कम स्वीकार करण्याची परवानगी आहे अशा सार्वजनिक क्षेत्रातील निवडक बँकांच्या शाखांत ही रक्कम आपणांस जमा करता येते. त्यासाठी प्राप्तिकर-काळात फॉर्म नं. ३९ भरावा लागतो व हे कोरे फॉर्म आपण आपल्या प्राप्तिकर अधिकाऱ्याकडून मिळवू शकता.

घोड्यांच्या शर्यतीत, ज्या माणसाला बक्षिसाची रक्कम देणार असाल त्या माणसाला ही रक्कम देताना ठराविक फॉर्म नं. १९ बीबी यावर प्रारंभीच करकपात करण्यात आली आहे हे प्रमाणपत्र द्या.

- दर तीन महिन्यांनी, १५ जुलैला, १५ ऑक्टोबरला, १५ जानेवारीला आणि १५ एप्रिलला, पूर्वीच्या तीन महिन्यांत किती करकपात केली आहे, ही माहिती, ठराविक फॉर्म नं. २६ बीबी यावर भरून पाठवा.

या संबंधात आपणास काही मार्गदर्शन अथवा मदत हवी असल्यास आपल्या प्राप्तिकर-अधिकाऱ्यास अथवा प्राप्तिकर-आयुक्तांच्या कार्यालयातील जनसंपर्क-अधिकाऱ्यास भेटा.

**करकायद्याप्रमाणे अंमलबजावणी केल्यास राष्ट्रनिर्मितीसाठी साधनसंपत्ति गोळा करण्यास मदत होते.**

निवेदक
**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**
( रिसर्च, स्टॅटिस्टिक्स अँड पब्लिकेशन्स )
**इन्कम टॅक्स डिपार्टमेंट**
नवी दिल्ली

davp 78 / 231
( Marathi )

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक बारावा

१९ ऑगस्ट १९७८

मूल्य १०० पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


## पत्रिका, प्रतिक्रिया व जाणकारांची मते !

या जनमत कौल उपक्रमाचे स्वागत कसे झाले? खर्च तीन आकडी, मुदत दहा-बारा दिवस या मर्यादा. त्यामुळे पाच हजार पत्रिका भरून आल्या, तर उत्तम प्रतिसाद. तीन हजार हा मध्यम व एक हजार हा वाईट प्रतिसाद असे गणित सुरुवातीला बांधले होते. शेवटी प्रतिसाद मध्यम आला. त्याचे विवरण अंकात दिले आहे.

मराठवाडा विभागात 'माणूस'चा प्रसार बऱ्यापैकी आहे. दंगलीमुळे वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. अंक अनेक ठिकाणी पोचू शकले नाहीत. त्यामुळे अपेक्षित हजार-बाराशे तरी पत्रिका कमी आल्या. त्या आल्या असत्या तर प्रतिसाद उत्तम ठरू शकला असता असे वाटते.

एका इंग्रजी नियतकालिकाने अशा स्वरूपाचा कौल अलिकडे घेतला तेव्हा इंदिरा गांधींना सर्वाधिक पाठिंबा असल्याचे त्यावरून दिसून आले होते. या जनमत कौलात तरी हा पाठिंबा मुळीच व्यक्त झालेला नाही. विदर्भात 'माणूस'चा प्रसार फार मर्यादित आहे. तो अधिक असता तर चित्र कदाचित वेगळे उमटले असते.

स्वतंत्र टिपणांची– प्रतिक्रियांची संख्या मात्र खूप आहे. काही या अंकात दिल्या आहेत. काही पुढील अंकी. विशेष म्हणजे जनमतपत्रिकांतून व्यक्त झालेला मतप्रवाह व टिपणांचा– प्रतिक्रियांचा सूर यात फार तफावत आहे. राजकारणाबद्दल विशेष आस्था बाळगणाऱ्यांकडून ही टिपणे, या प्रतिक्रिया स्वयंस्फूर्तीने आलेल्या असल्याने त्यांची दखल घेणे आवश्यक वाटते. जोडीने काही जाण-जाणकारांच्या प्रतिक्रियाही आवर्जून घेण्यात आलेल्या आहेत. सर्वसामान्य मतप्रवाह व या जाणकारांच्या प्रतिक्रिया यातील अंतर हा एक स्वतंत्र चर्चेचा विषय ठरू शकतो; पण पत्रिका, स्वयंस्फूर्त प्रतिक्रिया व जाणकारांची मते यातील विरोधी सूर टप्प्याटप्प्याने चढत गेलेला आहे हे जाणवल्यावाचून राहत नाही.

वेळ फार कमी म्हणून अनेकांचे सहकार्य घ्यावे लागले. पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक, वृत्तपत्र विद्याविभागातील विद्यार्थी यांचा आवर्जून उल्लेख करावयास हवा. त्यांच्या साहाय्याशिवाय जनमतकौल पत्रिकांच्या छाननीचे किचकट काम इतक्या कमी वेळात पूर्ण होऊ शकलेच नसते. 'माणूस' या सर्वांचा आभारी आहे.

या उपक्रमात सहभागी झालेल्या वाचक बंधू-भगिनींना व सहकारी पत्रकार–लेखक मित्रांना मनःपूर्वक धन्यवाद !

–संपादक

## नवे सरकार आणि मुंबईकर

गेले कित्येक महिने जी गोष्ट 'होणार होणार' म्हणून उत्तमरावांपासून चंद्रशेखरांपर्यंत अनेक जनतानेते सांगत होते ती गोष्ट एकदाची झाली. शरद पवारांकडून का होईना, पण वसंतदादांचे सरकार पद्धतशीर पाडले गेले आणि पुन्हा दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने, पूर्वी वसंतदादांनाही पाठिंबा द्यायला तयार असलेल्या जनता पक्षाने शरद पवारांच्या हाती नेतृत्व दिले आणि समाजसेवेची संधी मिळाल्याच्या आनंदात मंडळी सत्ताधीश झाली. पाचारण, शपथविधी, दिल्लीतली चर्चा, मंत्रिमंडळाची यादी, खातेवाटप असे सगळे सोपस्कार यथासांग पार पडले आहेत. आता तर चांगला ४० कलमी कार्यक्रमही जाहीर झालाय. प्रश्न केवळ उरलाय तो फक्त राजारामबापूंच्या 'भरती'-चा. आता एवढं मुख्यमंत्र्यांनीच सांगितलंय तेव्हा कधी ना कधी ते मंत्रिमंडळात येणारच.

महाराष्ट्रात एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे सत्ता जाण्याचा हा पहिलाच प्रसंग. अधिकारारूढ जनता पक्ष म्हणजे तमाम मुंबईकरांचा लाडका. थेट दत्ता सामंतांपासून वसंतराव होशिंगापर्यंत अनेक भल्याभल्यांना या लाटेनं लोळविलं. अख्खी मुंबई जिंकून जनता पक्षानं एक विक्रमच केला. केवळ निवडणुकीतच नव्हे, तर एरवीच्या सभा, मोर्चे, परिषदा अशा जनता पक्षानं आयोजिलेल्या अनेक कार्यक्रमांना मुंबईकर मोठ्या उत्साहानं प्रतिसाद देतात. या सगळ्या पार्श्वभूमीवर नव्या संमिश्र सरकारची स्थापना,

त्यातील जनता पक्षाची भूमिका, मंत्रिमंडळाची रचना अशा विविध विषयांवर, मुंबईकरांची प्रतिक्रिया जाणून घेणं, 'माणूस'च्या जनमतकौल उपक्रमाचा एक भाग म्हणून, आवश्यकच होतं. मुंबईकरांपैकी काही विशिष्ट तर काही सर्वसामान्य मंडळींशी त्यांच्या फुरसतीच्या वेळात मुद्दाम बातचीत केली ती एवढ्याचसाठी !

सर्वसाधारण मुंबईकर जनतेचा कौल नवं मंत्रिमंडळ स्वागतार्ह ठरविणारा आहे. मला भेटलेल्यांपैकी जवळजवळ सर्वांनाच नव्या सरकारची स्थापना योग्य आणि स्वागतार्ह वाटली; पण या घटनेच्या काही विशिष्ट पैलूंबाबत मात्र वेगवेगळ्या प्रकारची मतं अनेकांनी व्यक्त केली.

मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्रविभागाचे प्राध्यापक, ज्येष्ठ विचारवंत प्रा. य. दि. फडके यांनी या घटनेचं 'एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना' अशा शब्दात वर्णन केलं; परंतु एका पक्षातील एका गटानं पक्ष नेतृत्वाशी द्रोह केला असल्यामुळे, नैतिकदृष्ट्या ही घटना अयोग्य आहे. शरद पवारांचा गट स्वतःला काँग्रेसचाच मानत असला तरी मंत्रिमंडळ बनविताना पक्षश्रेष्ठींशी विचारविनिमय न करणं ही घटना बोलकी आहे. त्यामुळे यात तत्त्वांपेक्षा सोय अधिक महत्त्वाची असं मानण्यात आलं ही गोष्ट स्पष्ट होते. प्रा. फडके यांच्या मते इंदिरा काँग्रेसवर या घटनेचे देशव्यापी परिणाम होतील. ऐक्याचे गुऱ्हाळ यामुळे बंद पडले आहे आणि ऐक्यप्रयत्नांचे विरोधक काय करू शकतील याची जाणीव उभय काँग्रेसनेत्यांना झाली आहे. या घटनेमुळे जनता पक्षाची प्रतिमा कदाचित डागाळली नसेल; पण तो पक्ष उघडा पडला (एक्सपोज झाला) हे मात्र खरं. कारण शेवटी जनतानेत्यांना स्वतःचं सरकार आणता आलेच नाही. जे केले ते शरद पवारांनी. विरोधी पक्ष म्हणूनही एक शेकडा जनता आमदारांना फार महत्त्वाचं असं काहीही करता आले नाही. तेव्हा या सगळ्यांचे लक्ष पवार आणि चव्हाणांकडे होते. स्वतःला डावपेच जमले नाहीत त्यामुळे ते सतत पवार–चव्हाण यांचा धावा करीत बसले. शरद पवारांनी या तंत्रशून्यतेचा पुरेपूर फायदा घेतला.

महाराष्ट्राच्या दृष्टीने, या वेळी प्रथमच 'शुगर लॉबी' म्हणून ओळखला जाणारा आमदारांचा गट दुभंगला आहे. या नव्या सरकारला स्थैर्य आणि लोकप्रियतेच्या दृष्टीने किमान वेतन रु. ५ करणे आणि प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याची सोय करणे हे कार्यक्रम हाती घेणे महत्त्वाचे आहे.

पाटकर कॉलेजातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक राजेन्द्र भट यांच्या मते जनता पक्षाने 'आपण लोकशाही प्रेमी आहोत' यापेक्षा 'काँग्रेसपेक्षा वेगळे राजकारण आपल्याला जमत नाही' हेच अधिक स्पष्टपणे या घटनेतून सिद्ध केले आहे. नव्या सरकारामुळे जनता पक्ष जे लाभ अपेक्षित आहे त्या बाबतीत त्याचा भ्रमनिरास होणार असेही प्रा. भट यांना वाटते.

कांदिवलीच्या एका कंपनीतील अधिकारी श्री. प्रदीप महाजन यांना ही घटना लोकशाहीवादी चळवळीला बळकटी आणील असा विश्वास वाटतो. इंदिरा काँग्रेसला त्यांच्या मते आता फारसा वाव नाही. त्या पक्षाचे विदर्भातील बळही कमी होईल असा अंदाज प्रदीप महाजन यांनी व्यक्त केला.

वरळीच्या एका झोपडपट्टी भाडेकरू संघटनेचे नेते श्री. गजानन म्हात्रे यांनी नव्या सरकारने महत्त्वाचे प्रश्न सोडविले नाहीत तर त्याची गत काँग्रेससारखीच होईल असे सांगितले. नवे सरकार शहरी लोकांचे सरकार आहे असेही ते म्हणाले.

नव्या सरकारने सुशिक्षितांना रोजगारहमी दिलीच पाहिजे. अन्यथा एवढ्या फिया भरून आम्ही मुलांना शिकवितो ते कशासाठी ? असा सवाल पाटर्यातील एका सुविद्य गृहिणीने विचारला. कित्येक वर्षे ज्यांनी जनसेवेत घालविली अशा त्यागी व सेवाभावी व्यक्तींना नव्या सरकारात स्थान मिळाल्याने आता भ्रष्टाचार कमी होईल अशी आशा प्रशांत सुर्वे या विद्यार्थ्याने व्यक्त केली.

एका कारखान्यातील कामगार शांताराम पाटील, एक शिक्षक श्री. महादेवन्, एक व्यापारी श्री. केसरभाई मोटवानी यांच्यासह नाव प्रसिद्ध होण्याची इच्छा नसलेले एक शासकीय कर्मचारी या चौघांनी एकच प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांच्या मते नवे सरकार लोकशाही वगैरे तत्त्वांसाठी आले आहे या म्हणण्यात तथ्य नाही. ही सरळसरळ एक शुद्ध राजकीय फेरजुळणी आहे. उगाच तात्त्विक रंगसफेती कोणत्याच पक्षाने करू नये. कारण शेवटी जनता सर्व काही जाणते; पण तरी देखील नव्या राजवटीचे या सगळ्यांनीच स्वागत केले आहे. जनता पक्ष चांगल्या लोकांचा पक्ष आहे असे त्यांना वाटते. स्वाभाविकच त्यांच्या अपेक्षा देखील खूप उंचावल्या आहेत.

### प्रा. सदानंद वर्दे

मुंबईकरांचे तब्बल चार प्रतिनिधी नव्या मंत्रिमंडळात आहेत. मुंबईने हातचे काहीही न राखता जनताला विजय मिळवून दिला. तेव्हा वाजवी प्रतिनिधित्व अपेक्षित होते नि ते तसे मिळाले सुद्धा. त्यांपैकी एक म्हणजे शिक्षणमंत्री प्रा. सदानंद वर्दे. जनमतकौलातील मतप्रवाह त्यांच्या कानावर घालावा आणि त्यांच्याही मतांचा कानोसा घ्यावा या हेतूने प्रा. वर्दे यांची सचिवालयात मुलाखत घ्यायचे ठरविले. नव्या शिक्षणमंत्र्यांचा दरबार सध्या ठासून भरलेला असतो. त्यामुळे मुलाखतीऐवजी अवघ्या वीस मिनिटांच्या गप्पागोष्टींवर समाधान मानावे लागले.

प्रा. वर्दे म्हणाले, 'जनता पक्ष काँग्रेसपेक्षा वेगळा नाही असे वरवर जरी वाटत असले तरी ते खरे नाही. काही एका विशिष्ट परिस्थितीत संयुक्त सरकार स्थापन करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. सर्वाधिकारशाहीला जमेल तिथे कसून विरोध करायचा हे जनताचे धोरण आहे आणि नव्या सरकारची स्थापना हा त्याचाच एक भाग आहे '

जनता पक्षाच्या प्रतिमेवर या घटनेच्या संभाव्य परिणामांची चर्चा करताना प्रा. वर्दे म्हणाले, 'प्रतिमा डागळली असेलच तर ती उजळविण्याची एक संधी या दृष्टीने आम्ही या घटनेकडे पहातो. फीवाढ, वीजदरवाढ, सरकारी कर्मचाऱ्यांचा प्रश्न हे मागच्या सरकारने लोंबकळत ठेवलेले अनेक प्रश्न आम्ही सोडविले आहेत. काही ठाम निर्णय आम्ही घेतले आहेत. आमचा ४० कलमी कार्यक्रम खूपसा परिपूर्ण आहे.'

काँग्रेस (आय) बाबत बोलताना प्रा. वर्दे म्हणाले की, 'काँग्रेस (आय) ची जातकुळी जनतेला ठाऊक आहे. त्यामुळे शरद पवारांच्या पक्षांतराबद्दल त्यांनी नीतिमत्तेच्या प्रश्नावरून कितीही प्रचार केला तरी त्याचा उपयोग होणार नाही.'

शरद पवार गटाच्या मंडळींना खरोखरच लोकशाहीचे प्रेम होते तर या पूर्वीच ते व्यक्त व्हायला काय हरकत होती ? या प्रश्नावर, श्री. पवार हे आपले सहकारी नेते असल्यामुळे कोणतेही भाष्य करण्यास प्रा. वर्दे यांनी नकार दिला.

आपल्या सरकारच्या कामगिरीबद्दल दृढ आशा व्यक्त करताना, चर्चेच्या अखेरीस प्रा. वर्दे म्हणाले, 'जनमतकौलाचे निष्कर्ष काय येतील हे सांगणे कठिण आहे; पण मला जाणवलेली एक गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील जनता या सत्तांतरावर खूष आहे. लोक आशावादी आहेत आणि त्यांचा आमच्या सरकारला मनःपूर्वक पाठिंबा आहे. कोणतेही हितसंबंध जपण्यापेक्षा लोकहिताकडे आम्ही लक्ष देणार आहोत आणि त्यातूनच आमचे सरकार सामर्थ्यवान बनेल.'

—विनय सहस्रबुद्धे

# माणूस : जनमतकौल पत्रिकांचे विवरण

विनय हर्डीकर

महाराष्ट्रामध्ये नुकत्याच झालेल्या सत्तांतराविषयी जनतेच्या प्रतिक्रिया संमिश्र असणार हे अपेक्षितच होते आणि श्री. शरद पवार यांचा शपथविधी झाल्यानंतर या प्रतिक्रिया एकमेकांशी बोलताना, चर्चा करताना व्यक्त होऊ लागल्या होत्या. सध्याच्या कोणत्याही राजकीय स्थित्यंतराप्रमाणे याही घटनेला आणीबाणीच्या काळाची पार्श्वभूमी अपरिहार्य होती. १९७७ च्या लोकसभा–निवडणुकीतील विजयानंतरच्या गेल्या सव्वा वर्षाच्या काळात जनता पक्ष आणि काँग्रेस या देशातील प्रमुख पक्षांमध्ये जी स्थित्यंतरे घडली आणि बदललेल्या राजकीय परिस्थितीत काम करताना त्यांना जे यशापयश आले त्याचा संदर्भही महाराष्ट्रामधील सत्तांतराच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. राष्ट्रीय स्तरावरही अशा प्रकारचे सहकार्य पुरोगामी काँग्रेसजन आणि जनता पक्ष यांच्यात असावे ही काही जनता–नेत्यांची प्रतिक्रिया विशेष बोलकी होती. सत्तेच्या राजकारणात पुनरागमन करू पाहण्याच्या इंदिरा–काँग्रेसच्या झपाट्याला हा एक जबरदस्त रोधकही होता. बदलत्या परिस्थितीच्या सपाट्यात आणीबाणीच्या काळातील काही संदर्भ आता पुसले जाऊ लागले आहेत, तेव्हाचे गृहमंत्री आता मुख्यमंत्री म्हणून मान्य होऊ शकतात आणि तेव्हाचे मुख्यमंत्री आता अर्थखात्यासारखे महत्त्वाचे खाते अंगिकारतात, याचाही लोकांनी कसा विचार केला आहे, का स्वीकार केला आहे हे कळणे महत्त्वाचे होते. या घटनेच्या संदर्भात जनमतकौल घेण्याची कल्पना सुचली ती त्यामुळेच.

या जनमतकौलाचे स्वरूप फार गुंतागुंतीचे न ठेवण्याचे ठरले त्यालाही काही कारणे आहेत. नवीन मंत्रिमंडळ येणे या घटनेबद्दलच्या ठळक प्रतिक्रिया अजमावून बघाव्यात आणि कार्यक्रमपातळीवर नव्या सरकारकडून सुजाण नागरिकांच्या कोणत्या अपेक्षा आहेत ते जाणून घ्यावे एवढ्या दोन हेतूंनी प्रश्न विचारावेत असे ठरले. घटना, मूलभूत हक्क, पक्षपद्धती, पक्षबदल, मुदतपूर्व निवडणुका की राष्ट्रपती राजवट या आणि अशा अनेक तात्त्विक आणि पद्धतीविषयक गोष्टींवर प्रश्न विचारता आले असते; परंतु त्यात वेळ गेला असता व ताज्या प्रतिक्रिया मिळणे कठीण झाले असते. म्हणूनच या प्रश्नावलीचे स्वरूप मर्यादित ठेवण्यात आले. प्रश्न विचारताना प्रमुख पक्ष, लोकशाही, इंदिरा–काँग्रेस हा नवा पक्ष एवढ्यांवरच लक्ष केंद्रित केले गेले. कार्यक्रमांच्या बाबतीतही काही आर्थिक महत्त्वाचे, सामाजिक आशय असलेले, काही अनिवार्य असे तर काही तात्त्विक महत्त्वाचे असे कार्यक्रम पर्याय म्हणून देण्यात आले. रोखठोक अपेक्षा कळाव्यात, रोखठोक मते कळावीत हाच प्रमुख उद्देश या जनमतकौलामध्ये आहे.

प्रश्नावली तयार केल्यानंतर समाजातील विविध थरांचे प्रतिबिंब पडावे या दृष्टीने शक्य ते प्रयत्न करण्यात आले. शहरी–ग्रामीण अशा दोन्ही भागामधून प्रतिक्रिया कळाव्यात म्हणून विशेष काळजी घेण्याचे ठरले. पुणे, मुंबई, नगर, सातारा यांसारखी जिल्ह्यांची गावे; भोर, फलटण, मंचर, शेगाव यांसारखी तालुक्यांची गावे आणि करंजावणे, खेड–शिवापूर, नसरापूर, आळंदी अशी गावे आणि खेडी या जनमतकौलामध्ये सहभागी झाली आहेत. स्थानिक कार्यकर्ते, माणूस साप्ताहिकाचे मित्र आणि हितचिंतक, पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविभागाचे काही विद्यार्थी व त्यांचे मित्र यांनी फार महत्त्वाचे सहकार्य या कामी केले आहे. सुमारे ९०० वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया पोस्टाने स्वखर्चाने कळविल्या आणि १७०० प्रश्नपत्रिका व्यक्तिशः भरून घेण्यात आल्या. अशा प्रकारे साधारणपणे २६०० नागरिकांचे मत यात व्यक्त झाले आहे. त्यात नोकरी करणाऱ्यांचा गट सर्वांत मोठा असून त्याचे प्रमाण ४७%, स्वतंत्र व्यवसाय करणारांचे १२%, महिलांचे ४%, विद्यार्थ्यांचे १४%, शेतकऱ्यांचे ८%, इंजिनिअर–डॉक्टर–वकील यांचे ४%, मजुरांचे २%, व संकीर्ण व्यावसायिकांचे प्रमाण ९% इतके आहे. समाजातील कोणत्या वर्गाने याविषयी विशेष उत्साह दाखविला हे यावरून स्पष्ट व्हावे. इंजिनिअर–डॉक्टर–वकील या शहरवासींना 'माणूस' अपरिचित नसणार; परंतु त्यांनी कदाचित उदास राहण्याचे ठरविले असावे. नव्या परिवर्तनामुळे त्यांच्या व्यवसायामध्ये फारसा फरक नसावा, हेही कारण असू शकेल. मजूरवर्ग व शेतकरी यांचे प्रतिनिधित्व अधिक वेळ, पैसा आणि मनुष्यबळ खर्च करून वाढविता आले असते. मात्र बहुसंख्य प्रतिक्रिया जरी नोकरदारांच्या असल्या तरी हे नोकरदार म्हणजे नेहमीचे शहरी मध्यमवर्गीय नाहीत, त्यांच्यापैकी बरेच जण ग्रामीण भागातलेच आहेत ही एक समाधानाची बाब आहे.

एक मजूरवर्ग सोडता जनमतकौलाचा रोख झालेल्या घटनेस अनुकूल असाच आहे; परंतु मजुरांचा गट फारच लहान असल्यामुळे त्यांचा कौल पूर्णपणे सार्वत्रिक असेल असे वाटत नाही. विशेषतः मुंबईसारख्या प्रचंड संख्येने मजूर असलेल्या शहराने नुकताच जनता पक्षाला भरघोस प्रतिसाद दिलेला असताना ही प्रतिक्रिया चांगलीच फसवी वाटते. नोकरदार, स्वतंत्र व्यावसायिक, महिला, विद्यार्थी यांनी तर फार मोठ्या बहुमताने झाली ही घटना योग्य झाली, असे म्हटले आहे. त्यांच्यापैकी ७५%, लोक 'योग्य' या मताच्या बाजूचे आहेत. शेतकऱ्यांपैकी ५५%, मंडळींना हे योग्य वाटले; वकील-डॉक्टर-इंजिनिअर यांची मते दोन्हीकडे जवळपास सारखीच आहेत. एकूण आकडेवारीचा विचार करता ७१%, लोकांना नवे मंत्रिमंडळ अधिकारावर येणे ही घटना योग्य झाली असेच वाटते.

महाराष्ट्रातील पुरोगामी लोकशाही आघाडीचे भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे, असे मतदारांनी भरवोसाने व्यक्त केले आहे. ७३%, मतदारांनी ही घटना लोकशाहीला 'उप-

कारक' असल्याचे सांगितले आहे. गटशः प्रतिक्रिया याही बाबतीत प्रश्न क्र. १ च्या उत्तरांप्रमाणेच आहेत. आकडेवारीत देखील फरक नाही. साधक-बाधक मतांचे प्रमाणही तितकेच आहे.

एकूणात ७१% मतदारांना या घटनेमुळे इंदिरा काँग्रेस बळकट होणार नाही असे वाटते, हे फार महत्त्वाचे आहे. ही आघाडी फार काळ टिकणार नाही, ती कोलमडल्यानंतर मुदतपूर्व निवडणुकांचे दिव्य सर्व पक्षांना करावे लागेल आणि जनतेच्या प्रतिक्रियात्मक वृत्तीमुळे परत एकदा इंदिरा काँग्रेस आणि पर्यायाने इंदिरा गांधी यांच्या हाती सत्ताशकट जाईल, असा निराशावादी सूर मधून मधून ऐकू येत असताना जनतेने व्यक्त केलेली ही खात्री फार महत्त्वाची आहे. या प्रश्नाचे उत्तर देताना डॉक्टर मात्र बहुसंख्येने इंदिरा काँग्रेस बळकट होणार नाही असे म्हणतात, तर शेतकरी, इंजिनिअर, वकील यांची मते दोन्ही बाजूंना सारखीच आहेत. अल्पसंख्य का होईना, पण मजुरांनी इंदिरा काँग्रेसच बळकट होणार असल्याचे म्हटले आहे.

पहिल्या तीनही प्रश्नांना ७०% हून अधिक मतदारांनी जनता पक्षास अनुकूलता दाखविली असल्याने आणि 'माणूस' साप्ताहिकानेही 'जनता पक्षा'चाच प्रचार निवडणूक-काळात केल्याने या जनतमतकौलामध्ये जनता पक्षप्रेमींचाच भरणा आहे, जनता पक्षाच्या भक्तमंडळींची यात गर्दी आहे असा भास होईल; पण तो भासच आहे. कारण ज्या ग्रामीण भागातून कार्यकर्त्यांनी मतपत्रिका भरून घेतल्या त्यापैकी अनेक ठिकाणाहून काँग्रेसचे उमेदवारच निवडून गेलेले आहेत. हे एक कारण. दुसरे कारण अधिक महत्त्वाचे आहे आणि ४ थ्या प्रश्नाच्या उत्तरात ते स्पष्ट झालेले आहे. या बनावामुळे जनता पक्षाची लोकमानसातील प्रतिमा डागळली की उजळली, हा प्रश्न फार महत्त्वाचा होता. कारण ४७ सालच्या काँग्रेसप्रमाणेच ७७ साली सत्तेवर आलेल्या जनता पक्षावर जनतेच्या आशा-आकांक्षा व अपेक्षा यांचे फार मोठ ओझे आहे. असे असतानाच दुसरीकडे अंतर्गत संघर्ष आणि सत्तेच्या राजकारणात होणारी अपरिहार्य ओढाताण यामुळे या पक्षाची प्रतिमा झपाट्याने कोसळते आहे. आता निवडणुका झाल्यास मतदार जनता पक्षाला दारातही उभे करणार नाहीत, शहरी सुशिक्षित आणि ग्रामीण अशिक्षित दोघांच्याही मनातून जनता पक्ष उतरला आहे अशीही भीती व्यक्त करण्यात येते. या जनमतकौलात मात्र ६०% मते जनता पक्षाची प्रतिमा उजळली असे समर्थन करणारांची आहेत. ६०% बहुमत हे वाईट तर खास नाही; परंतु पहिल्या तीन उत्तरांच्या संदर्भात ते चांगलेच कमी आहे आणि जनता पक्षाच्या नेतेमंडळींना हा एक महत्त्वाचा सिग्नल जनतेकडून मिळाला आहे. काँग्रेसपेक्षा बरा पक्ष एवढीच प्रतिमा जनता पक्षाची आहे की काय, असाही निष्कर्ष यामधून काढता येईल. विद्यार्थी, स्वतंत्र व्यावसायिक, महिला, नोकरदार, संकीर्ण हे जनता पक्षाचे प्रमुख समर्थक. या सर्वांना प्रतिमा पूर्वीइतकी उजळ राहिलेली नाही, असेच वाटते. ७५% नोकरदारांना ही घटना योग्य वाटली होती; परंतु त्यांच्यापैकी ६१% नाच यामुळे जनता पक्षाची प्रतिमा उजळली असे वाटते. शेतकऱ्यांनी मात्र या बाबतीत फारसा तरतमभाव केलेला नाही.

कार्यक्रमाविषयाचे आपले मत व्यक्त करताना मतदारांच्या प्रतिक्रियांत पहिल्या चार प्रश्नांप्रमाणे सुसंगती आढळत नाही असे दिसते. या पाहणीचा अधिक सखोल अभ्यास करू इच्छिणारांना हे एक आव्हान आहे आणि हे कोडे त्यांनी उकलावे अशीच कोणाचीही इच्छा असणार. मुख्य म्हणजे कुटुंबनियोजन, शेतीउत्पन्नावर कर, एक गाव एक पाणवठा या तथाकथित पुरोगामी कार्यक्रमांवर मतदारांचा फारसा भर दिसत नाही. त्यांनी सुशिक्षितांना रोजगार हमी आणि प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय असणेच अधिक महत्त्वाचे मानले आहे व त्याखालोखाल मते कुटुंबनियोजन आणि किमान वेतन रु. ५ च्या बाजूने दिली आहेत. चार गटांनी सुशिक्षितांना रोजगारहमी असावी याला पहिला क्रमांक दिला असून, तीन गटांनी दुसरा क्रमांक दिला आहे, हे फारच महत्त्वाचे वाटते. बेकारी, निर्मूलनाचा प्रश्न जनता सर्वाधिक महत्त्वाचा मानते, हे यावरून स्पष्ट होईल. एवढेच नव्हे तर शिक्षण घेतल्यानंतर नोकरी सरकारने दिलीच पाहिजे असेच शहरी-ग्रामीण सर्व सुशिक्षित जनतेला वाटते. शिक्षण घेतल्यानेही नोकरी मिळत नाही हा दुःखद अनुभवच कदाचित याच्यामागे असावा.

प्रत्येक खेडेगावात पिण्याच्या पाण्याची सोय असावी, याला चार गट प्रथम प्राधान्य देतात तर त्यांच्यापैकी एकही मोठा गट एक गाव एक पाणवठा असावा, याला तिसरे प्राधान्यही देत नाही, याचाही अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. नव्या सरकारकडून किंवा कोण-

पृष्ठ २२ वर

**मतदारांचा सहभाग**

| | |
|---|---|
| नोकरदार | ४७ % |
| विद्यार्थी | १४ % |
| स्वतंत्र व्यावसायिक | १२ % |
| शेतकरी | ८ % |
| महिला | ४ % |
| इंजिनिअर, डॉक्टर, वकील | ४ % |
| मजूर | २ % |
| संकीर्ण | ९ % |
| | १०० % |

**मतानुक्रमे अग्रक्रम**

| कार्यक्रम | मते |
|---|---|
| १. सुशिक्षितांस रोजगार हमी | १७२१ |
| २. प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय | १७०६ |
| ३. सक्तीचे कुटुंब नियोजन | ११८० |
| ४. किमान वेतन रु. ५ | ११५५ |
| ५. एक गाव एक पाणवठा | ८७५ |
| ६. शेती उत्पन्नावर कर | ६८६ |

# तीन मुलाखती

छाया दातार

## श्रीनिवास सरदेसाई
## प्रभाकर संझगिरी
## एस. के. लिमये

१९ ऑगस्टचा 'माणूस'चा विशेषांक शरद पवार मंत्रिमंडळाच्या निर्मितीच्या सदर्भात काढायचे ठरले आणि माजगावकरांनी मला विचारले, 'डाव्या पक्षांच्या नेत्यांची प्रेस स्टेटमेंटस् आलेली आहेत. ती प्रसिद्ध करण्यापेक्षा मुलाखती घेतल्या तर कसे होईल? अधिक जिवंत प्रतिक्रिया वाचकांपर्यंत पोचू शकतील.' मला कल्पना पटली. प्रासंगिक प्रेस-स्टेटमेंटस् ही काही एक वैचारिक बैठक गृहीत धरून प्रसिद्ध केली जातात. सामान्य वाचक पुष्कळदा या बैठकीविषयी अनभिज्ञ असतो. तेव्हा बातचीत करताना काही मुद्द्यांचे स्पष्टीकरण अधिक मिळू शकेल या दृष्टीने सध्या मंत्रिमंडळात नसलेल्या तीन डाव्या पक्षांची म्हणजेच भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व लाल निशाण पक्ष यांच्या नेत्यांच्या मुलाखती घेण्याचे ठरले. हे तिन्ही पक्ष या सरकारात सामील नाहीत आणि तरीही त्यांच्या याविषयी वेगवेगळ्या भूमिका व धोरणे आहेत. त्यांचे मतभेद सर्व छटांसह वाचकांपर्यंत पोचू शकले तर उत्तमच. म्हणूनच सामान्य बुद्धीजीवी माणसांच्या मनातील प्रश्न घेऊन कॉ. श्रीनिवास सरदेसाई (भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य), कॉ. प्रभाकर संझगिरी (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे विधानसभेतील आमदार), कॉ. एस. के. लिमये (लाल निशाण पक्षाच्या कार्यवाह समितीचे सदस्य) यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांचे संक्षिप्त टिपण.

## तिसरा पर्याय दूर गेला !

'माणूस' ने तयार केलेल्या 'जनमतकौल'ची प्रश्नपत्रिका दाखवूनच कॉ. श्रीनिवास सरदेसाईंच्या मुलाखतीला सुरुवात झाली. 'महाराष्ट्रात हे पहिले संमिश्र पवार मंत्रिमंडळ येणे ही घटना मला योग्य वाटते, अयोग्य वाटते,' यावर सरदेसाईंची प्रतिक्रिया होती, 'या तऱ्हेची प्रश्नाची मांडणी मला चूक वाटते. काही माणसे गेली, दुसरी आली. वर्गीय स्वरूप बदलले का? चांगली माणसे आली तरी ती चौकटीच्या बाहेर काही करू शकतील का?'

'एवढ्या मोठ्या अपेक्षेने हा प्रश्न विचारला नाही. ही घटना trend-setter ठरेल का? एकाधिकारशाही विरोधी शक्ती एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू झाली का?'

'कोणत्या अर्थाने? या नव्या सरकारची जुळणी कोणत्या शास्त्रशुद्ध पायावर, तत्त्वांच्या आधारे झाली आहे? हे तत्त्वशून्य, संधिसाधू राजकारण आहे. काही कार्यक्रमांच्या आधारे, राजकारणातील काही समान परंपरांच्या पार्श्वभूमीवर संसदीय युती होऊ शकतात; पण आज ज्या तऱ्हेने मंत्रिमंडळ तयार झाले आहे– म्हणजे जनसंघापासून (वस्तुतः आर्. एस्. एस्.) ते शे. का. प. पर्यंत परस्परविरोधी विचारप्रणालींचे लोक जेव्हा मंत्रिमंडळ तयार करतात तेव्हा ते तत्त्वशुद्ध असू शकत नाही. इंदिरा गांधींचे राजकारण व प्रवृत्ती एकाधिकारशाही आहे याबद्दल दुमत नाही; परंतु त्या धोरणाला विरोध करायचा असेल तर आपल्या देशातील ज्या खऱ्या लोकशाहीवादी व समाजवादी शक्ती आहेत त्यांच्या युतीनेच खरी विरोधी आघाडी उभी राहील. वेड्या वाकड्या कोणत्याही पक्षांच्या युतीने एकधिकारशाहीला शह बसू शकत नाही. शरद पवार स्वतःला लोकशाहीवादी म्हणवितात व इंदिरा गांधींचे कट्टर शत्रू म्हणवितात, मग खरी डावी लोकशाही आघाडी तयार करण्यासाठी प्रयत्न का करीत नाहीत? तसे करण्यास अवधी लागेल खरा; पण त्या कारणाखाली संधीसाधू कृतीचे समर्थन होऊ शकत नाही. राजकारणात यक्षिणीची कांडी नसते. इंदिरा गांधींची एक हुकुमशाही प्रवृत्ती आहे तर जनता पक्षाच्या पाठीशी असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा संपूर्ण प्रतिक्रांतिकारकपणा आहे. या दोघांना टाळून तिसरी शक्ती उभी करण्यासाठी धडपड का नाही? इंदिरा गांधींना विरोध करण्याच्या भूमिकेची दुसरी बाजू लगेच प्रो-जनता कशी होऊ शकते? इंदिरा गांधींना विरोध जरूर करा; पण त्या वेळी भारताच्या व्यापक इतिहासाचे, व्यापक राजकारणाचे काही भान ठेवाल की नाही? Indian history is bigger than Indira Gandhi-problem. हुकूमशाहीला विरोध ठीक आहे; परंतु आज देशात ज्या हुकूमशाही प्रवृत्ती बळावत आहेत त्यांच्या मागे देशातील भांडवली विकासाच्या मार्गावर ओढवलेले भयानक संकट आहे. मक्तेदार भांडवलदार, सरंजामदारी, साम्राज्यवादी हे या प्रवृत्तींच्या मागे आहेत. त्यांना देशात संसदीय लोकशाही चालू ठेवणे अशक्य होत चालले आहे. या

शक्तींना इंदिरा गांधी किंवा जनता पक्ष यांचे सोयर-सुतक नाही. गरजेप्रमाणे एकाला किंवा दुसऱ्याला हाताशी धरून या शक्ती स्वतःचा संकुचित स्वार्थ साधीत आहेत हल्ली झालंय काय, प्रतिगामी आणि पुरोगामी या संकल्पनांमध्ये काही फरकच नाही असे समजून बोलण्याचा प्रघात सुरू झालेला दिसतो '

'व्यापक राजकारणाचे भान ठेवायचे म्हणजे निश्चित काय ?'

'म्हणजे राजकारण केवळ इंदिरा गांधी या व्यक्तीभोवती सीमित न होऊ देणे. आज विरोधकांचे राजकारण काय किंवा त्यांच्या पाठीराख्यांचे राजकारण काय, त्यांना केंद्रभागी समजून होते आहे. त्याचाच फायदा त्या उठवताहेत. मला शरद पवारांना प्रश्न विचारायचा आहे, तुम्ही काँग्रेसमध्ये होतात. या काँग्रेसला काही इतिहास आहे. विशिष्ट धोरणे, भूमिका आहेत. इंदिराबाई नंतर आल्या. त्यांनी पक्ष ताब्यात घेऊन एकाधिकारशाही राबविण्याचा प्रयत्न केला. त्यांना तुम्ही हाकला; पण म्हणून काँग्रेस सोडायची ? वारसा टाकायचा ? तुम्ही आर्. एस्. एस्. ला जवळ करता. मग त्यांच्या हातात कोलीत मिळते. पुन्हा एकदा त्यांना मास-बेस मिळायची शक्यता तयार झाली आहे. कशामुळे ? ज्यांनी तिला झिडकारले तेच लोक तिच्याकडे आशेने का बघायला लागले ? जनता पक्षाबद्दल त्यांचा भ्रमनिरास झालेला आहे. जनता–विरोधी भावना त्यांच्या मनात आहे. पण त्यांना पुढारीपण द्यायला हवे आहे. त्यांच्या असंतोषाला संघटित करायला हवे आहे. आज त्या कार्याकडे कम्युनिस्ट पक्ष दुर्लक्ष करीत आहे. डाव्या कम्युनिस्टांवरही माझे हेच आरोप आहेत. त्यांचा एक पाय जनता पक्षाच्या आत आणि एक विरोधात. अशा भूमिकेमुळे लोकांना तिसऱ्या पर्यायाचे महत्त्व कळत नाही. इंदिरा काँग्रेस व जनता पक्ष दोन्ही भांडवली आहेत व आपल्याला खरे डावे व लोकशाहीवादी राज्य उभे करायचे आहे. त्यासाठी सर्व डाव्या प्रवृत्तींनी एकत्र यायला पाहिजे. हा तिसरा पर्याय लोकांपुढे स्पष्ट उभा राहात नाही. आता केरळचेच घ्या ना ! तेथे अँन्थनी काँग्रेस ( यशवंतराव काँग्रेस, आमचा पक्ष व इतर यांचे संयुक्त सरकार ) आहे. ते इंदिरा काँग्रेसविरोधी आहे. त्यात तुम्ही या, असे आम्ही मार्क्सवाद्यांना सांगतो आहोत; पण ते यायला तयार नाहीत. त्यांना येथील शरद पवार काँग्रेस व जनता यांच्या संमिश्र मंत्रिमंडळाला पाठिंबा देता येतो; पण तेथे आम्ही चालत नाही.'

'तुम्ही सध्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणाला दोष देत आहात की, 'आर्थिक प्रश्नांवर आंदोलने चालू ठेवूनही त्या आंदोलनाला जनतासरकार विरोधी टोक द्यायला आज मार्क्सवादी तयार नाहीत.' १९७३ सालापासून जेव्हा देशातील आर्थिक प्रश्न तीव्र झाले होते व जनतेमध्ये असंतोष मोठ्या प्रमाणावर होता तेव्हा तुम्हीसुद्धा अशा प्रकारची भूमिका घेऊन इंदिरा गांधींना राजकीय आव्हान द्यायला तयार नव्हता. दोघांच्या भूमिकेमध्ये फरक काय ?

'त्या वेळी आमची भूमिका अशी होती की, जनतेच्या आर्थिक प्रश्नांवर चळवळी झाल्या पाहिजेत व तशा चळवळी आम्ही करीत होतो; परंतु त्या चळवळीतून इंदिरा गांधींचे सरकार पाडून त्या ठिकाणी दुसरे सरकार आणण्याचे प्रयत्न झाले असते तर ते सरकार त्या काळात अत्यंत प्रतिगामी शक्तींचेच झाले असते. खरे पाहिल्यास त्या काळातही डाव्या पक्षांची एकजूट करून तिसरा राजकीय पर्याय निर्माण करण्याची गरज होती. ते आम्ही करू शकलो नाही, हे आमचे अपयश. तोच दोष आज मार्क्सवादी पक्षाच्या पदरी पडत आहे.'

'या सगळ्या पार्श्वभूमीवर तुम्हाला शरद पवार नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाचे भवितव्य काय वाटतंय ? वसंतदादा पाटलांच्या नेतृत्वाखालील संयुक्त काँग्रेस मंत्रिमंडळापेक्षा या नव्या मंत्रिमंडळामध्ये काही फरक वाटतो का ?'

'या दोघांमध्ये फरक शोधायचा म्हणजे 'उडदामाजी काळे-गोरे' एवढाच फरक. दोघेही साखर-कारखानदारांचे प्रतिनिधी. दोघांचाही वर्गीय पाया एकच. फक्त नवीन मंत्रिमंडळ अनेक घटकांचे मिळून बनलेले असल्यामुळे त्यांना आपले सरकार स्थिर करण्यासाठी जनतेच्या मागण्यांचा विचार करावा लागण्याची शक्यता आहे. शिवाय चळवळीतून गेलेल्या काही व्यक्ती या मंत्रिमंडळात आहेत. त्यामुळेही जनतेच्या प्रश्नांचा विचार थोडा काळजीपूर्वक करावा लागेल इतकेच. मात्र हे होण्यासाठी जनतेच्या प्रभावी चळवळी कराव्या लागतील. एरवी ते होणार नाही.'

'हे सरकार टिकू शकेल का !'

'असे आहे, सध्या निवडणुका कोणालाच नको आहेत असे दिसते. कोणालाच आपल्या बळाची खात्री नाही. तेव्हा आहे त्या संख्याबळाच्या जोरावरच परम्युटेशन्स कॉम्बिनेशन्स करावी लागतील. या बंधनामुळे काही काळ तरी सध्याचे सररकार टिकून राहू शकेल.' □

## केरळची व महाराष्ट्राची तुलना होऊ शकत नाही !

कॉ. संझगिरींना भेटायचे ठरविले त्या वेळी माझ्या मनात सर्वांत पुढे आलेला प्रश्न होता, 'महाराष्ट्रात शरद पवार काँग्रेस चालतं तर मग केरळातील अँथनी काँग्रेस का नको ?' या प्रश्नाचे उत्तरही संझगिरींनी परखडपणे आणि आत्मविश्वासाने लगेच दिले. 'केरळची परिस्थिती महाराष्ट्रापेक्षा खूपच वेगळी आहे. तेथील वर्गशक्तींचा बॅलन्स वेगळा आहे. तेथे डावी व लोकशाही आघाडी बांधण्याचे काम बरेच पुढे गेले आहे. श्रमिक जनतेची तेथली फळी गुणात्मकदृष्ट्या महाराष्ट्रापेक्षा चांगली व बलवान आहे. महाराष्ट्रात डाव्या पक्षांचे बल त्या मानाने अत्यल्प आहे, त्यामुळे येथे शरद पवार, जनता पक्ष, शे. का. पक्ष व रिपब्लिकन पक्ष यांच्या संयुक्त मंत्रिमंडळाला पाठिंबा देणे म्हणजेच एकाधिकारशाही विरोधी शक्तींना पाठिंबा देणे होय व त्यातून डावी व लोकशाही आघाडी उभी करण्याचे प्रयत्न होऊ शकतात.

यानंतरच्या प्रश्नोत्तरांनाही अशीच धार होती. '१९७७ साली लोकसभेच्या निवडणुकांच्या वेळी इंदिराबाईंच्या विरोधी पारड्यात जाणीवपूर्वक सगळे टाकणे आवश्यक आहे, असे तुम्ही ठरविले; पण त्यानंतरच्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये काही ठिकाणी तुम्ही वेगळी भूमिका घेतली. महाराष्ट्रातही काही वेगळ्या परंपरा आहेत. जयप्रकाशांची चळवळ ऐन भरात असतानासुद्धा येथील डाव्या

पक्षांनी आपली संयुक्त आघाडी कायम ठेवून विशिष्ट आर्थिक मागण्यांसाठी चळवळ करीत जनतेच्या असंतोषाला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला होता. येथील चळवळीने जयप्रकाशांचे नाव घेतले नव्हते. येथील डावे पक्ष फारसे बलवान नाहीत; पण येथे लक्ष्मणरेषा पहिल्यापासून आखल्या गेल्या आहेत. समाजसुधारणेची चळवळ येथे राजकारणाच्या बरोबरीने चालू राहिली आहे. अशा पार्श्वभूमीवर तुमचा नव्या सरकारला पाठिंबा कोणत्या भूमिकेतून ?'

'हे बघा, आमची भूमिका अगदी स्वच्छ आहे. सध्या इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीचा धोका हा देशापुढील प्रमुख धोका आहे. तेव्हा जेथे जेथे ही एकाधिकारशाही प्रवृत्ती तोंड वर काढील तेथे तेथे लोकशाहीवादी प्रवृत्तींना पाठिंबा देणे, ही आमची प्रमुख भूमिका आहे. तसेच शरद पवारांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळाची जुळणी ही वसंतदादांच्या व इंदिरा काँग्रेसच्या संमिश्र मंत्रिमंडळापेक्षा अधिक जनताभिमुख आहे, असे आमचे मापन आहे. त्यांच्याबरोबर त्यांच्या कार्यक्रमाबाबत जी चर्चा झाली त्यातून या सरकारकडून काही रिलीफ जनतेला मिळू शकेल असे वाटते.'

'मग तुम्ही मंत्रिमंडळात कसे नाहीत ?'

'जेथे जेथे आमचा पक्ष कायदेमंडळात व बाहेरही लहान आहे तेथे संयुक्त मंत्रिमंडळात भाग घ्यायचा नाही, हे तत्त्व आम्ही पाळतो. आसाममध्येही आम्ही नकारच दिला. या सरकारात जरी काही डाव्या प्रवृत्तीची मंडळी आलेली असली तरी ते मूलतः भांडवली पक्ष आहेत. त्यांनी एकाधिकारशाही विरोधी भूमिका घेतलेली असली तरी सामाजिक व आर्थिक कार्यक्रमांच्या बाबतीत आमच्यात बरेच मोठे मतभेद आहेत. मात्र मर्यादित उद्देश पार पाडण्यासाठी त्यांच्या पुरोगामित्वाच्या मर्यादा लक्षात घेऊनच त्यांना Critical political support देणे आम्ही श्रेयस्कर मानले.'

'शरद पवार व त्यांचे बरेच सहकारी यांनी आणीबाणी राबविली. ते त्या वेळच्या सरकारचे घटक होते. असे असून ते एकाधिकारशाही विरोधी असतील याला पुरावा काय ? किंबहुना शरद पवारांची आताची भूमिका ही तत्त्वविहीन व व्यवहारवादी आहे असे नाही वाटत ?'

'अशा रीतीने व्यक्तींना राजकारणातून write off करण्याची गरज आम्हाला वाटत नाही. उजव्या कम्युनिस्ट पक्षानेही आणीबाणीला पाठिंबा जाहीर केला होता. तरीही त्यांनी आपले धोरण चुकले म्हटल्यावर आम्ही त्यांच्याशी संयुक्त कृती करण्याची तयारी दाखविली आहे. शरद पवारांनी आज तरी काँग्रेस व इंदिरा काँग्रेस यांच्या एकाधिकारशाही–धार्जिण्या युतीविरुद्ध झगडा उभा केला. काँग्रेस पक्ष सोडण्याची भूमिका घेतली. तेव्हा ते एकाधिकारशाहीवादी नाहीत असे आम्ही मानतो. आमचा हा पाठिंबा तत्त्वशून्य राजकारणाला असलेला पाठिंबा असे आम्हास वाटत नाही.'

'केंद्रातून इंदिरा गांधींना उखडून टाकल्यावर राज्यपातळीवर एकाधिकारशाहीचा धोका राहतो का ?'

'हो, धोका दोन्ही पातळ्यांवर असतो. एक लक्षात ठेवले पाहिजे की, एकाधिकारशाही ही केवळ एका व्यक्तीच्या लहरीपणावर अवलंबून नसते. तिच्यामागे वर्गीय शक्ती असतात. राज्यकर्त्या वर्गाची ती अरिष्ट काळातील गरज असते. आज एकाधिकारशाही प्रवृत्ती दोन्ही पक्षांत आहेत. मात्र गेल्या तीन वर्षांच्या इतिहासामुळे एकाधिकारशाही विरोधी शक्ती एकत्र येऊन त्यांची फळी उभारली गेली आहे. म्हणूनच आम्ही मानतो की, आज एकाधिकारशाहीवादी शक्तींचा आविष्कार इंदिरा गांधींच्या मार्फतच होऊ शकतो. इंदिराबाई अजूनही आणीबाणीचे समर्थन करतात. त्यांचा आणीबाणीच्या काळातील घटनाबदल रद्द करण्यास विरोध आहे. आज जनता पक्षाकडून आर्थिक, सामाजिक कार्यक्रमांबाबत पुरोगामी दिशा लावण्यास विलंब होतो आहे, टाळाटाळ होतेय व असंतोष पसरतो आहे. त्याचा फायदा घेऊन इंदिरा काँग्रेस एकाधिकारशाही विचार व वजन वाढवू पहात आहे. हा धोका केंद्र व राज्यपातळीवर कायम आहे.'

'जनता पक्षातील एकाधिकारशाही प्रवृत्तीचा उल्लेख केला, ती कोणती ?'

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी व मोठ्या मालदारवर्गाशी संबंधित अशा विचारसरणीचे अनेक लोक आज जनता पक्षाच्या आजूबाजूला आहेत.'

'आर्. एस्. एस्. ने लोकशाहीला पाठिंबा दिला आहे, तो खरा आहे का ?'

'छे ! छे ! त्यांनी स्वतःची भूमिका तात्पुरती Manuvoure केली आहे.'

'मग आर्. एस्. एस्. ची एकूण शक्ती व त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव हा Dying Force वाटतो का ?'

'अजिबात नाही. त्यांची संघटना गेल्या वर्षभरात वाढली आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की आर्. एस्. एस्. ही जनता पक्षाची मुख्य शक्ती नाही आणि एकाधिकारशाहीचा मुख्य धोका आज तरी त्या दिशेतून नाही.'

'केवळ संसदीय युतींनी एकाधिकारशाहीचा धोका टाळता येतो का ?'

'अजिबात नाही. या युतीचा उपयोग 'डावपेच' म्हणूनच करायचा असतो. एकाधिकारशाहीचा धोका टाळण्यासाठी अखेर डावी लोकशाही आघाडी बांधणेच आवश्यक आहे. वर्गसंघटना ताकदवान होऊन जनतेची चळवळ वाढली तरच हा धोका टाळता येईल. तरीही संसदीय व्यासपीठाचा फायदा तुम्ही घेतला पाहिजे. विशेषतः सत्ताधारी वर्गामध्ये आपापसात भांडणे होत असताना, त्यांचे विघटन होत असताना तुम्ही फायदा उठविला पाहिजे. आताच बघा ना, आम्ही परवा दोन अॅडजर्नमेंट मोशन्स विधानसभेत आणल्या. आपल्या फी-वाढविरोधी निदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार झाला त्याबद्दल व दुसरी सिमेन्स कंपनीतील ९५० कामगारांना काढून टाकले त्याबद्दल. इंदिरा काँग्रेसच्या लोकांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. 'तुमचा सरकारला पाठिंबा असताना तुम्ही अशा मोशन्स आणू शकत नाही.' आम्ही सांगितले, 'आमचा पाठिंबा आंधळा नाही. शिवाय हा नियम नाही आणि परिस्थितीशी न जुळणारे संकेत आम्ही पाळणार नाही !'

'शरद पवारांनी १९७७ साली काँग्रेसचे विभाजन होण्यापूर्वी एकदा डाव्या पक्षांशी बोलणी करण्याचा व लांब पल्ल्याचे उद्दिष्ट ठेवून कार्यक्रम आखण्याचा प्रयत्न केला होता. अॅन्टी इंदिरा, अॅन्टी

जनता अशी फळी ते तयार करीत होते. तेच गृहस्थ आता जनता-पक्षाला बरोबर घेऊन मंत्रिमंडळाची रचना करीत आहेत. याबद्दल काय वाटते ?'

'अशा प्रयत्नांची मला माहिती नाही. हा प्रयत्न म्हणजे wishful thinking असावे. येथील वास्तवाला धरून तो प्रयत्न नाही. म्हणूनच तो वांझोटा ठरला. डाव्या प्रवृत्ती जनता पक्षातही आहेत. महाराष्ट्रात विशेषच आहेत. त्या प्रवृत्ती जनता पक्षाला सोडून बाहेर याव्यात एवढी राजकारणाची कोंडी अजून झाली नाही.'

'महाराष्ट्रातील पार्श्वभूमी बघता जनता पक्षाला पाठिंबा देण्यापेक्षा डाव्या युतीसाठी येथ प्रयत्न करणे हे तुमचे वर्गकर्तव्य नव्हते का ?'

'याचे उत्तर मघाशीच आलंय. येथे काँग्रेसची मक्तदारी नष्ट होतीय ही महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातले डाव्या पक्षाचे बळ व वर्गशक्तीचे बलाबल पहाता बंगाल वा केरळसारखी डावी लोकशाही आघाडी आज येथे शक्यच नाही. आज उजवे कम्युनिस्ट व लाल-निशाण या आमच्या प्रयत्नात सहभागी नाहीत; पण उद्या गरज निर्माण झाली तर डावी लोकशाही आघाडीसाठी त्यांना आमच्या-बरोबर यावेच लागेल.'

'आपली आजची भूमिका भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या १९७१ ते १९७५ या काळातील भूमिकेचीच आवृत्ती नाही का ?'

'अजिबात नाही. कम्युनिस्ट पक्षाचे त्या काळातील धोरण ही त्यांची स्ट्रॅटेजी होती. रणनीती होती. इंदिरा सरकारच्या आणीबाणीमधील धोरणांना त्यांनी राष्ट्रीय लोकशाहीची पुरोगामी धोरणे मानली होती. आमचे आजचे धोरण केवळ डावपेचात्मक आहे. जनता पक्षाच्या वर्गस्वरूपाबद्दल आमचे भ्रम नाहीत. आम्ही आमचे स्वातंत्र्य टिकवून ठेवले आहे. आम्ही जनता पक्षाच्या मागे फरफटत जात नाही. आम्ही आमचे बळ वाढवीत आहोत.'

'बळ वाढविणे म्हणजे काय ? जनसंघटनांची ताकद वाढविणे की संसदेतील सभासदसंख्या वाढविणे ?'

'दोन्ही गोष्टी परस्पर पूरक आहेत. जनसंघटनांवरील आमचा प्रभाव निश्चित वाढला आहे व आमचे संसदीय कार्य त्याला सहाय्यक ठरले आहे.'

'गेली दोन वर्षे दाबून ठेवलेला असंतोष व सध्याच्या आर्थिक प्रश्नांमुळे निर्माण झालेला असंतोष बाहेर पडू लागला आहे. त्याला पुढारीपण देणे आवश्यक वाटत नाही का ? नाही तर हा असंतोष इंदिरा गांधींच्या मागे आधार शोधील.'

'आमच्या ताकदीप्रमाणे आम्ही चळवळी करीत आहोत व सर्व पक्षातील लोकशाहीवादी प्रवृत्तींना त्यात आणू पहात आहोत.' ◻

## हे सरकार अल्पायुषी ठरणार आहे !

कॉ. दत्ता देशमुखांच्या सहीने काढलेल्या लाल निशाण पक्षाच्या पत्रकात नव्या मंत्रिमंडळाविषयी व महाराष्ट्रातील नजीकच्या राजकीय परिस्थितीबाबतचे वर्णन थोडक्यात असे आहे– 'समाजवादी काँग्रेस आघाडीतील अंतर्गत संघर्षापेक्षा अधिक तीव्र संघर्ष पुरोगामी लोकशाही आघाडीत समाविष्ट आहेत. निरनिराळ्या राजकीय दलांच्या आशा-आकांक्षा व अपेक्षांना मुरड घालूनच हे मंत्रिमंडळ तयार झाले आहे... कोणत्याही एखाद्या जनविभागाचा स्थिर पाठिंबा या सरकारला नाही व अनेकविध अंतर्विरोधांनीही नवीन 'जुळणी' भरलेली आहे... म्हणूनच हे सरकार अल्पायुषी ठरणार आहे.'

या पार्श्वभूमीवर मी कॉ. एस्. के. लिमये यांना प्रश्न विचारायला सुरुवात केली. 'ह्या सरकारमध्ये अनेक जनविभागांचे प्रतिनिधित्व करणारे घटक असल्याने या सरकारला काही प्रमाणात जनतेच्या मागण्या मान्य कराव्या लागतील. वर्गीय हितसंबंधांना कात्री लावूनसुद्धा काही वेळा सरकारला चालावे लागेल. कारण हे संघटन काही काळ तरी कायम ठेवण्यासाठी अशी धोरणे आवश्यक ठरतील असे अनेकांना वाटते. तुमचे म्हणणे उलट दिसते...'

'हो. आमचे असे ठाम मत आहे की, हे मंत्रिमंडळ लोकांच्या क्रियाशीलतेचा आधार घेऊन झालेले नाही. लोकांची मागणी होती, लोकांच्या हालचाली होत्या, म्हणून त्या हालचालींना प्रतिसाद किंवा त्यांचे संसदीय आविष्कार म्हणून हे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले नाही. हा 'पॅलेस कू' आहे. एकाला खाली खेचून दुसरे तेथे बसले एवढेच. वसंतदादा साखर-कारखानदारांचे प्रतिनिधी तर शरद पवार, गोविंदराव आदिक, संभाजीराव काकडे हेही दुसऱ्या गटाचे प्रतिनिधी. वर्गीय पायामध्ये फरक काय ? जे पुरोगामी घटक आता या मंत्रिमंडळाला पाठिंबा देत आहेत आणि ज्यांचा जीव लोकशाहीसाठी तळमळत आहे त्यांनी पुन्हा एकदा निवडणुकांचा आग्रह का धरला नाही ? जनतेचा कौल का घेतला नाही ? येथे शिफारसपत्रे देण्याची घाई झालेली दिसते. इंदिरा काँग्रेस सोडून महिना झाला नाही तोवर त्यांना मंत्रिपद दिले जाते. असले सरकार काय मूलभूत बदल करू शकणार ?'

'मूलभूत बदलाची अपेक्षा पाठिंबा देणारेही करत नाहीत. प्रश्न आहे तो relief मिळण्याचा. ह्या सरकारला जनतेच्या काही मागण्यांचा विचार करावा लागेल की नाही ?'

'रिलीफ कोण देते ? सरकार देते की जनता मिळविते ? जनतेच्या चळवळी वाढल्या तर कोणत्याही सरकारला रिलीफ द्यावाच लागतो. वसंतरावदादांनाही द्यावा लागला असता. त्यांनाही आक्रमक पवित्रा घेता आला नाही. कारण पक्षांतर्गत अडचणी होत्या. जनतेची ताकद वाढविणे महत्त्वाचे की वरवरच्या बदलांनी काही परिस्थिती बदलेल अशी आशा करणे योग्य ? या सरकारच्या जनताभिमुखपणाबद्दल काही विधान करायला मी तयार नाही. बघू या. अनेक प्रश्न आहेत. ते नवे सरकार कसे हाताळेल यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्या, रोजगारहमीवरील किमान वेतन, एकाधिकार कापूसखरेदी या मागण्या पूर्ण केल्या तर दुसरीकडे कात्री लावावी लागेल.'

'बाकीच्या कार्यक्रमांसंबंधी थोडा विचार बाजूला ठेवू; पण लोकशाहीबद्दल काय ? लोकशाही टिकून रहाण्यास या नव्या जुळणीची मदत होईल का ?'

पृष्ठ १८ वर

जनमत कौल पत्रिका भरून पाठवण्यासंबंधी 'माणूस' अंकातून आवाहन केलं गेलं होतं. काही तरूण मित्रांनी ( मुख्यतः पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात शिक्षण घेत असलेल्या ) आसपासच्या खेडे-विभागात व निवडक शहरी विभागात जाऊन जनमत कौल पत्रिका भरून आणण्याचे कामही स्वयंस्फूर्तीने केले. सर्वांनाच हा अनुभव नवीन वाटला, महत्त्वाचा वाटला. यातील काहींनी आपले अनुभव येथे टिपणस्वरूपात मांडले आहेत–

# जनमत कौल : चालते बोलते अनुभव

## एक : चंद्रकांत दीक्षित

'सा. माणूस'ने जनमत कौल घ्यावयाचे निश्चित केल्यावर त्यातला काही प्रत्यक्ष कामाचा हिस्सा उचलणे क्रमप्राप्त होते आणि अशी क्रमप्राप्तता आल्यावर त्यासाठी हिंडणे भाग होते. म्हणून प्रत्यक्ष ग्रामीण भागातच जावे आणि श्री. शरद पवार यांच्या संमिश्र मंत्रिमंडळासाठी लोकमत (अर्थात मर्यादा आहेच) घ्यावे यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे ७० गावांशी संपर्क साधला, काही ठिकाणी समक्ष गेलो.

या जनमतकौलात ज्यांनी आपली मते दिली त्यात समाजाच्या सर्व थरांचे प्रतिनिधित्व आहे, असे बिनदिक्कतपणे म्हणता येईल. डॉक्टर, प्राध्यापक, प्राथमिक / माध्यमिक शिक्षक, विविध पक्षीय राजकीय कार्यकर्ते, तसेच शेतकरी, महाविद्यालयीन विद्यार्थी, स्त्री कार्यकर्त्या, सुशिक्षित बेकार, मजूर आदी सर्व थरातून उत्साहाने काम झाले. अर्थात कामे उत्साहाने होतात याचा अर्थ एवढाच की, ओळखी असतात, त्याचा फायदा लवकर होतो.

सतत पाच दिवस भ्रमंती केली व जनमतकौलाचे ८००-९०० फॉर्म्स भरून घेतल्यावर ते चाळणे आणि फॉर्म्स भरले जात असताना त्यावर झालेल्या कॉमेंट्स् ऐकणे हे फार आनंदाचे क्षण असतात, असे वाटते. एक तर आपले काम होताना फॉर्म भरणारा जे काही बोलत असतो ते त्याच्या विचारांचे प्रतिबिंब असते आणि नकळत त्याचे विचार आपल्याला वेगळेच काही सांगून जातात. अर्थात असे उपक्रम वारंवार होत नसल्याने लोकही अशा उपक्रमाचे स्वागत करतात आणि आपली खुली मते मांडतात.

शेवगाव हे तालुक्याचे गाव. एका डॉक्टरांकडे बसलो. डॉक्टरांनी 'आज काही विशेष' असे विचारताच त्यांना कामाचे स्वरूप सांगितले व जनमतकौल-चाचणीचा फॉर्म दिला. डॉक्टरांनी तो आधी वाचला आणि सांगितले, 'चांगला उपक्रम; पण मला आणखी काही लिहून द्यावयाचे आहे.' म्हटलं, अवश्य द्या ! त्यांनी एक पान पाठपोठ आपले विचार व्यक्त केले. हे डॉक्टर नाही म्हटले तरी चाळीस वर्षे राजकीय, सामाजिक कार्यकर्ते आहेत. कॉंग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते. ते आपल्या लिखित अभिप्रायात म्हणतात, 'स्वातंत्र्यपूर्व काळात जी सेवेची बैठक होती ती स्वातंत्र्योत्तर काळात बदलली आहे. आता केवळ सत्तेची बैठक झाली आहे. शंकरराव चव्हाण, वसंतदादा, शरद पवार यांच्या वयात अंतर असेल; पण त्यांनी ज्या पद्धतीने सत्ता कमाविली तिचे सूत्र मात्र एक आहे, अशी सत्तालोलुप मंडळी लवकरच जातील व परत आमची गांधी–नेहरूंची कॉंग्रेसच लोकांपुढे राहील.' आणखीही त्यांचे म्हणणे होते, ते ऐकले. डॉक्टरांचा निरोप घेताघेताच एक वकीलमहाशय भेटले. नमस्कार झाल्यावर त्यांना फॉर्म दिला. तर ते म्हणाले, 'कोर्टात चला.' (काहीही कारण नसता कोर्टात का बुवा, अशी शंका मनात यावयाची; पण प्रश्नार्थक चेहऱ्याने त्यांनीच खुलासा केला, 'अनायासे कोर्ट चालू आहे. सगळे वकील एकदम भेटतील तसे अशीलही.' चला तर चला !

या गावातले अनेक वकील आय. कॉंग्रेसचे आहेत. भराभरा फॉर्मचे वाटप आणि भराभरा प्रश्नातील तिसरा प्रश्न... 'जनता पक्षाची प्रतिमा डागाळली / उजळली...' यात 'डागळली'वर जोर देत 'उजळली'वर काट मारला जात होता. काही कोर्ट-कामासाठी आलेले अशील हाताशी धरले. बोधेगावचे शाहीर किसनराव गोरेही भेटले. त्यांनी फॉर्म भरल्यावर एकच ओळ जादा लिहिली. 'पवार-मंत्रिमंडळ कॉंग्रेस मोडण्यास चांगले आहे.' हशा झाला. समोर एक म्हातारे गृहस्थ होते. आपल्या दोघा मुलांशी गप्पा हाणत. (मुलं म्हणजे वये सुमारे २५–३०) फॉर्मचे वाचन सुरू केले तेव्हा म्हातारे गृहस्थ म्हणाले, 'काय वो भाऊसाहेब, ह्यो शरद पवार आमच काम करील का ?'

कामाचे स्वरूपच माहीत नव्हते म्हणून म्हटलं, 'कसले काम हो ?'

'आता बघा ही माझी पोरं. दरुड्यात धरली. आता जामीनावर हैत. त्यैना सोडील का त्यो ?'

खरोखर यात मला काहीच बोलता येईना म्हणून घुटमळलो. तर म्हाताऱ्याने तरातरा पोरांचे हातून फॉर्म्स घेतले व मला परत देताना म्हटले, 'इच्यायला, येवढं बी काम त्यो पवार करीना, मंग

करायचं काय त्या पवाराचं ?'

खरंच होतं त्याचं म्हणणं. असे दरोडेखोरांना मुख्यमंत्री सोडवू लागले तर साऱ्या दरोडेखोरांचाच पाठिंबा मुख्यमंत्र्यांना राहील. असा पाठिंबा परवडणारा नाही.

अशाच एका डॉक्टरमित्राकडे बसलो. त्यांचे पेशंटस् सुशिक्षित कर्मचारी अशा वर्गातले. कुणीही आला की, डॉक्टरच उत्साहाने त्याला फॉर्म्स भरावयास सांगत. पेशंट्स म्हणत काय भानगड आहे ? पण डॉक्टर समजावून सांगत. या डॉक्टरांनी एक बात मात्र मस्त केली. ते म्हणाले, 'आमदार निवडून दिला की, पाच वर्षांनी परत भेटीला येतो; पण पत्रकार मात्र वारंवार विविध निमित्ताने येतात आणि आता तर आपली मते ते अजमावीत आहेत !'

'व्वा डॉक्टर ! पत्रकारांविषयी एवढा जिव्हाळा दाखविल्याबद्दल धन्यवाद !'

'आम्ही शासकीय सेवेत आहोत. तेव्हा आम्हाला आमची मते नोंदविता येणार नाहीत.'

चार–पाच जणांचा घोळका एस्. टी. स्टँडवर होता. इतर काही मित्र फॉर्म्स भरीत होते, म्हणून त्या घोळक्यानेही आवर्जून फॉर्म्स घेतले. वाचल्यावर वरील उत्तर दिले. त्यांनी फॉर्म्स भरले नाही, म्हणून राग आला नाही, तर ज्या पद्धतीने उत्तर देताना समाजापासून फारकत दाखविली त्याची चीड आली म्हणून जरा कडक शब्दांत म्हटले, 'आपण लोक राज्यपाल तर नाहीत ना की, मत दिले तर काही त्वरित फेरफार होतील ?' त्यांना अशा ( उर्मट म्हणा) प्रश्नांची अपेक्षा नव्हती. कारण 'साहेब, साहेब' अशी ऐकावयाची सवय. खाडकन् प्रमुख साहेबाने चेहरा टाकला आणि 'तसं नाही साहेब (म्हणजे मला)तरीपण'...एस्. टी. आली आणि साऱ्यांनाच जागा मिळाली.

'तुला खरं सांगू का'... अशा शब्दाने एका मित्राने फॉर्म वाचल्यावर म्हटले, 'खरं तर हे सरकार टिकणार नाही. अरे, अंगाची लाही झाली असे सरकार झाल्यामुळे. अरे, केवढी संधी आली होती जनता पक्षाला सकस विरोधी पक्ष म्हणून काम करण्याची ! मोर्चे निदर्शने, मोर्चे, संप–हरताळ असे दर आठवड्याला कार्यक्रम करता आले असते; पण सगळेच बेटे सत्तेच्या मागे ! आपले कष्ट फुकट गेले बघ!'

तो मित्र फॉर्मवर काय लिहीणार यासाठी ज्योतिषाची गरज नव्हती. मित्र चांगला वकील आहे; पण वकिलीऐवजी पुढारीपण करतो अन् तेही काँग्रेसच्या विरोधात.

नेमकी याच्या विरोधी भूमिका अहमदनगर शहर युवक काँग्रेसच्या सेक्रेटरींची आहे. अकोला शहरात पुराचे पाणी शिरले, जीवित–वित्त हानी झाली म्हणून ही युवक मंडळी त्यांच्या मदतीसाठी भर बाजारात बूट पॉलिशचा कार्यक्रम करीत होती व मदत गोळा करीत होती. ओळख होतीच. एकदम फॉर्म्स भरलेही जाणार होते, म्हणून त्या छोट्याशा मंडपात बसलो. सेक्रेटरींनी लिखित प्रतिक्रिया दिली की, 'शरदरावांनी प्रतिगामी जनता पक्षाबरोबर युती केली म्हणून काही वृद्ध काँग्रेसजन नाराज आहेत; परंतु शरदरावांचे हे धाडसी पाऊल काँग्रेस पक्ष बलवान करणारेच ठरेल. कारण शरदरावांबरोबर महाराष्ट्रातील तरुण एकवटून एकदिलाने हुकूमशाहीविरुद्ध उभे राहिले आहेत'...

अनेक प्रतिक्रिया या जनमतकौलाच्या निमित्ताने ऐकावयास मिळाल्या. आमचा एक तरुण डॉक्टर तर संतापाने लिहितो की, 'इच्छा नसताना हा फॉर्म भरून देत आहे. कोणतेही ठाम तात्त्विक मूल्य घेतलेले व कार्यक्रमाची आखणी करून अंमलात आणणारे आज सरकार नाहीच. त्यापेक्षा सैनिकी राजवट बरी... जनता पक्षाची प्रतिमा पूर्ण डागाळली आहे...' तर एकजण लिहितो, 'सरकारने सुशिक्षित बेकारांसाठी खूप खूप नोकऱ्या तयार कराव्यात. कारण त्यांना भांडवल नाही, म्हणून धंदा करता येत नाही. म्हणून नोकरीशिवाय पर्याय नाही.' एक माध्यमिक शिक्षक म्हणतात, 'सध्याचे मंत्रिमंडळ ही घटना संधिकाल म्हणून ठीक. कायमस्वरूपी योग्य नाही.' तर पुण्यातले श्री. सरदेशमुख म्हणतात, 'माणूस ही एकच जात मानून प्रत्येक तहानलेल्या व्यक्तीस स्वच्छ निर्मळ पाणी कोणत्याही दडपणाशिवाय पिण्यासाठी उपलब्ध व्हावे.' एकाने सुचविले आहे 'किमान वेतन १० रु. रोज व मध्यमवर्गासाठी त्यांना परवडतील अशी घरे सरकारने बांधावीत.' एक वैद्यकीय व्यवसातील कार्यकर्ते वैतागाने म्हणाले, 'केंद्रात काय नि महाराष्ट्रात काय, समाजवादी मरणार रे ! जनतेचे प्रश्न सुटणार कसे ? कारण काँग्रेस व जनतातील इतर पक्ष भांडवलशाहीवर्गाचेच आहेत. त्यांचेच भले होईल !' तर ही प्रश्नावली म्हणजे 'जनसंघ' दृष्टिकोनातली म्हणून ती भरण्यात अर्थ नाही' असेही एकाने लिहिले आहे. 'हे संमिश्र मंत्रिमंडळ म्हणजे खुर्ची सांभाळणारे मंत्रिमंडळ आहे, त्यापेक्षा निवडणुका घ्या.' असा सल्ला एकाने दिला आहे.

कुणी काय प्रतिक्रिया व्यक्त करावी हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. आपण फक्त काम करायचे.

जनमतकौलाच्या निमित्ताने शहरी भाग व ग्रामीण भाग यांच्या विचारसरणीतील अंतर मात्र अतिशय जाणवले. प्रश्नातील कार्यक्रमाबद्दल विशेषतः हे जाणवते. प्रत्येक गावात 'एक गाव एक पाणवठा' या कार्यक्रमावर शहरी भागात बव्हंशी 'व्हावा' अशी प्रतिक्रिया आहे, तर ग्रामीण भागात 'प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय' यावर भर आहे आणि ही सोय झाली तर एक पाणवठ्याची गरज काय, अशी टिप्पणी झाली. हेच शेतीउत्पादनावर कर प्रश्नाबाबत म्हणता येईल. शहरी परंतु बिगरशेतीवाला कर ( तो जबरदस्त बसवा येथपर्यंत) बसविलाच पाहिजे असे मतप्रदर्शन करतो, तर खेड्यातला मजूरसुद्धा अजिबात कर असू नये असे मत देतो.

एक गाव एक पाणवठ्याबाबत शोकांतिका अशी, को एका हरिजन कार्यकर्त्याने नेमका त्याचा अर्थ विचारला. म्हणून त्याला सांगितले की, 'सर्व जाती-जमातींनी एकत्र एका आडावर पाणी भरणे.' तर त्याने नापसंती व्यक्त करताना म्हटले, 'म्हंजे तिथं मांग बी पाणी भरणार ह्ये खरं नाही !' मला धक्का बसताना जाणवले की, आम्हीच या जातींची पाळेमुळे खोलवर रुजविली आहेत. केवढा जातीजातीत तिरस्कार दिसून येतो. शहरात त्याचे काही वाटत नाही; परंतु ग्रामीण भागात जातीप्रस्थ अद्यापही तेज आहे, याची चुणूक वरील उत्तरात आहे.

'सक्तीचे कुटुंबनियोजन' या कार्यक्रमाविषयी सुशिक्षित स्त्रिया अनुकूल कौल देतात, तर पुरुषवर्ग प्रतिकूल आढळतो. विशेषतः

ग्रामीण भागात. प्रतिकूलता का, तर अमुक अमुक गावात फलाण्याचे ऑपरेशन केले अन् नंतर त्याचा एकुलता एक मुलगा गमावला.' आता वंशाला दिवा राहिला का?

या वंशाच्या दिव्यातून एवढेच जाणवते की, उत्साहाच्या भरात व इष्टांक पुरा करण्याच्या गडबडीत सरकारी कर्मचारी खेड्या-पाड्यांतून बेगुमानपणे वागले. आणीबाणीचा सर्रास फायदा त्यांनी घेतला. अर्थात नुसतेच कर्मचारी दोषी आहेत असे नाही, तर आणी-बाणीचे समर्थक, सत्ताधारी पक्षातले लहान-मोठे चेले गावगन्ना (सवतीच्या) कुटुंबनियोजनाची शिबिरे भरवीत होते, त्यांची दहशत अद्याप गेली नाही. आता तर उलट कार्यक्रम याबाबतीत सुरू आहेत.

'किमान वेतन–रुपये पाच' या कार्यक्रमाला मोठ्या शेतकऱ्यांचा विरोधच दिसून येतो. मी फॉर्म भरून घेतलेल्या अशा मोठ्या सुमारे १५० शेतकऱ्यांनी त्यास विरोध दर्शविला आहे, तर शहरी विभागात 'पाच' हवाच, उलट तो वाढला पाहिजे असे मत आहे.

वेगवेगळी मते ही जातीनिहाय असली तर समजू शकते; परंतु ती पक्षनिहाय आहेत. एवढेच नव्हे तर एकाच पक्षातील दोन कार्यकर्त्यां-तही कार्यक्रमावर भिन्न मते आहेत याचे आश्चर्य वाटते. आता अगदी (भूतपूर्व प्रजासमाजवादी आणि संयुक्त समाजवादी) समाजवादी पक्षातल्या दोघांनी फॉर्म भरून दिले. सहज चाळता असे लक्षात आले की, एकाने 'एक गाव एक पाणवठ्या'ला विरोध केला होता, तर दुसऱ्याने त्याला अग्रक्रम दिला होता. असाच प्रकार एका घरातील परंतु पक्षदृष्ट्या जागृत असलेल्या पिता-पुत्रांनी नोंदविला आहे. पित्याचे मत आहे, सुशिक्षितांसाठी रोजगार-हमी पुष्कळ झाली. मुलाचे मत आहे, 'किमान वेतन रुपये पाच हवे. हमी देऊ नये.'

जनमतकौलात सर्वच पक्षीयांनी आपली मते नोंदली आहेत. त्यातही वैचित्र्य आहे. जे जुने कांग्रेसचे आहेत व ज्यांनी कधीही सत्तेसाठी प्रयत्नही केले नाहीत, त्यांना शरद पवार यांची बंडखोरी हा सत्तेसाठी केलेला व्यभिचार वाटतो तर तरुण कांग्रेसवाले मात्र 'वाईट झाले नाही' असे म्हणतात, तर जनता पक्षीय थरात कडवट प्रतिक्रिया आहे. कारण एक: 'आम्ही १०० ते १०४ असताना (आमदार) शरद पवार कोण टिक्कूजी मुख्यमंत्री होणार? आम्ही (आमच्यातील कुणीही) होणार!'

'एसेम्'ना म्हातारपण आले, अशी कडवट प्रतिक्रिया एका ग्रुपने दिली. 'म्हणे, शरद पवारांचे नेतृत्व मान्य आहे! त्यांचे नेतृत्व मान्य आहे तर जनतेचे अध्यक्ष राहता कशाला?' हा सवाल.

अनेकांची अनेक मते. तरीही एक मात्र जाणवते, हे मंत्रिमंडळ किती दिवस टिकेल याची चर्चा सर्वत्र चाललेली आहे. केवळ सहा महिनेच टिकेल, येथपासून टर्म पुरी करील येथपर्यंत मते आहेत. तरीही एक म्हणालाच, 'हे मंत्रिमंडळ कांग्रेस आणि समाजवाद्यांचे आहे. दोघे एकत्र आले आणि चाललेत जनसंघाला घालवायला!'

खरे तर एसेम्नी जाहीर करावयाचे की, 'बाबा शरद, दादांनी चाळीस जणांचे मंत्रिमंडळ केले. तू तुझ्याबरोबर आलेल्या सगळ्या कांग्रेस-आमदारांचे मंत्रिमंडळ बनव. आम्ही तुला बाहेरून पाठिंबा देऊ!' पण तसे नाही. खुशाल घुसले मंत्रिमंडळात. एका परीने खरेही आहे म्हणा. तीस वर्षे विरोधात काढल्याने संघर्ष-शक्ती संपलेलीच आहे विरोधकांची.

एका ठिकाणी अगदी चर्चा करून मते नोंदली गेली. संमिश्र ग्रुप होता. त्यातल्या एकाने दुसऱ्यास म्हटले, 'काय पंत, तुम्हाला एक गाव एक पाणवठा नको ना?'

'नाही हो! तसे नाही. आम्ही जाणीवपूर्वक तो व्हावा म्हणून मान्यता देत आहोत. आम्ही आता पहिल्याश्रमाचे राहिलो नाही.'

प्रश्नोत्तरांतून त्यांचे पूर्वाश्रम स्पष्ट होत होते. अर्थात 'जनमत-कौल' मर्यादित प्रमाणावर आहे याची जाणीव आहे; परंतु अशा कामातून शेकडो नागरिकांचे विचार कळण्यास नक्की मदत होते आणि हाच अनुभव मोलाचा ठरतो. तोच माझ्या लेखी आहे, हेही नसे थोडके. ◘

---

## दोन : अविनाश धर्माधिकारी
## संजय गोखले

---

'जनमताचा कौल' घेण्यासाठी मुख्यतः खेड्यांमध्ये गेलो होतो. चिंब पावसाचे दिवस आहेत; पण या कामासाठी लोकांना भेटणे, मतांवरून छेडणे हा एक चांगला अनुभव होता.

कात्रज घाटापलीकडील भोर तालुक्यातील काही खेडी. उदा. कल्याण, कोंढणपूर, खेड, आर्वी, शिवापूर, कुसगाव, वेळू, गौडदरा इ. ३००–५००, फार तर १००० उंबरठ्यांची खेडी.

आलेल्या मतपत्रिकांवरून एकूण जनतेने शरदराव पवारांचे निर्विवाद स्वागत केल्याचे, त्यामुळे जनता पक्षाची प्रतिमा उजळल्याचे दिसते. इंदिरा-कांग्रेसची शक्ती वाढेल, वाढणार नाही यावर समान विचार आहेत. 'नाही'च जास्ती.

सरकारने प्राधान्य द्यावयाच्या कामात 'प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय' यावर एकमत आहे. 'किमान वेतन रु. पाच'ला खेड्यातील लोकांनी प्राधान्य दिल्याचे तर 'सुशिक्षितांसाठी रोज-गार-हमी'ला शहरी नागरिकांनी प्राधान्य दिल्याचे दिसते. कुटुंब-नियोजनापेक्षाही 'एक गाव एक पाणवठा'ला मते जास्त आहेत.

अर्थात हे ज्यांनी मतपत्रिका दिल्या त्यांचे. न देणारेही खूप निघाले. 'नको रे बाबा नसती कटकट' किंवा 'ते राजकारणाचे आम्हाला नगा इचारू' इत्यादी. काही जणांना हा कसला तरी गुप्त प्रकार आहे, असा संशय आला. मतपत्रिका हातात घेऊन, वाचून परत करणारेही काही.

खेड्यात कित्येकांना पवार-मंत्रिमंडळ आल्याचे सांगावे लागते. नशीब, देशात जनता सरकार आल्याची माहिती द्यावी लागली नाही. 'कोणीही असलं तरी आमचे हाल काय कमी होणार आहेत का?' 'सगळेच लुच्चे!' अशाही काही प्रतिक्रिया.

काही 'कौल' फारच चलाखपणे दिलेले आहेत. 'मंत्रिमंडळ-बदलाचा हा प्रकार आणि एकूणच सगळं राजकारण हा स्वार्थाचा, सत्तापिपासेचा खेळ आहे. त्याच्याशी जनतेचा नाहक भरडून निघण्या-पलीकडे काही संबंध नाही. त्यामुळे या कुठल्याच प्रश्नांना आमची उत्तरे नाहीत,' असाही एक विचार आहे. एका अध्यापकांची प्रतिक्रिया वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी कुठल्याच प्रश्नावर खूण केलेली नाही आणि सरकारने प्राधान्य देण्याच्या कार्यक्रमात 'चारित्र्यनिर्मिती'

असे लिहिले आहे.

एकूण राजकारणावर वैतागणारे कौल असले तरी बहुतांशी लोकांना, अगदी खेड्यातल्याही, ठाम अशी मते आहेत हे जाणवते. हा कौल देण्याच्या निमित्ताने, निवडणुकांशिवाय इतरही केव्हा केव्हा जनतेचा कौल घ्यायचा असतो, असा पायंडा समाजाच्या अभ्यासकांना पाडता येईल. जिवंतपणा टिकून राहायला त्याने मदत होते. असे काही कागद हातात आले की, लोक विचार करायला लागतात.

मतपत्रिका कोणीच, ब्याद टाळायची म्हणून किंवा माझ्यावर उपकार केल्याच्या थाटात भरल्या नाहीत. उलट बहुतेक सर्वांनी विचार करून खुणा केल्या. असे उपक्रम ठराविक काळाने घ्यायला हवेत. या कारणाने का होईना, शहरी विद्यार्थी खेड्यांतील लोकांना जाऊन भेटू शकतील. इतर अनेक फायदे आहेत.

समाजातील जवळ जवळ सर्व प्रकारच्या नागरिकांच्या प्रतिक्रिया; ते वेगळ्या स्तरांमधले आहेत म्हणून वेगळ्या आहेत, असे वाटले नाही. यात विद्यार्थी, नोकरी करणारे टर्नर, फिटर, समाजसेवक, अध्यापक, शेतकरी, बेकार, सुशिक्षित–अशिक्षित असे सर्व आहेत. यांनी स्वतःपलीकडे जाऊन राजकीय विचार केला आहे. त्यामुळे शहरातील सर्वांनी खेड्यात पाण्याची सोय हवीच, असे म्हटले आहे, तर खेड्यातील काही शेतकऱ्यांनी वगैरे आश्चर्यजनकरीत्या 'सुशिक्षितांसाठी रोजगार-हमी 'ला प्राधान्य दिले आहे.

असा हा 'जनमताचा कौल' आणि त्यावरील 'हा सगळा बावळटपणा, फालतूपणा आहे' ते 'विचार करून दिलेली उत्तरे, जोडलेली टिपणे' अशा प्रतिक्रिया. म्हणून म्हटले, या कामासाठी पाच-पन्नासांना भेटणे, छेडणे हा एक चांगला अनुभव होता. ◻

---

## तीन : मुकुंद संगोराम
## चारुचंद्र भिडे

---

पुण्यातील निरनिराळ्या भागात 'जनमतकौलपत्रिका' भरून घेताना एक शहरी अनुभव आला. मध्यमवर्गीय लोक तर 'राज्य करणारा चांगभला' असं न समजता आपापली मते स्पष्टपणे नोंदवीत होते. श्री. कृ. गो. घाणेकर, सेवानिवृत्त शिक्षक यांनी या संदर्भात आपली वेगळीच प्रतिक्रिया नोंदविली आहे. ते म्हणतात, 'नवीन मंत्री त्यागी वृत्तीचा, सत्तेसाठी न हपापलेला, शुद्ध चारित्र्याचा, सत्तेपेक्षा पक्ष-बांधणीच्या कार्यास महत्त्व देणारा असावा.'

झोपडपट्टीतील नागरिकांकडूनही जनमतकौल घेण्यात आला. तिथला अनुभव मात्र खेड्यात जो आला तोच ! नागरिकांना हा कौल म्हणजे सरकारचा कौल आहे, असे वाटत होते. कित्येकांची त्यामुळेच जनमतकौल देण्यास नाराजी दिसली; पण त्याबरोबरच नागरिक मार्मिकपणे बोलूनही दाखवत होते. 'शेतकऱ्यांची पोरे इथे कॉलेजमध्ये येताना गाड्या घेऊन येतात आणि त्यांना म्हणे शेती-उत्पन्नावर कर नको ! वारे वा, शेतीउत्पन्नावर कर हा बसवलाच पाहिजे.' इथल्या कुणा व्यक्तीची स्वतःची जमीन नाही; पण त्यांचा हा मुद्दा मात्र विचारार्ह आहे.

झोपडपट्टीवासीयांनी (दांडेकरपूल, सर्व्हे नं. ३०) सक्तीच्या कुटुंब नियोजनास नाराजी दर्शविली; पण काहींनी तर, 'सुशिक्षितां-साठी रोजगार हमी' मान्य केली. त्या सर्वांचे म्हणणे एकच होते की, सरकारने या सर्व कार्यक्रमांपेक्षा झोपडपट्टीचा प्रश्न आधी सोडवावा. म्हणजे झोपडपट्टी उठवून त्यांना 'सिमेंट कॉंक्रीटच्या चाळी' बांधून द्याव्यात असे त्यांचे म्हणणे नाही, तर पिण्याच्या पाण्याची सोय, सरकारी दवाखाने, घरांना छपरे या मूलभूत अड-चणी सोडविण्यात सरकारने पुढाकार घ्यावा.

हा मुद्दा मात्र सरकारपुढे अजूनही मांडला गेला नाही... त्याची जाणीव या नागरिकांनी करून दिली.

पुण्याप्रमाणेच भोर या जवळच्या गावीही आम्ही जनमतकौल घेण्यासाठी गेलो होतो. तिथेही अगदी वेगवेगळे अनुभव आले.

अगदी पहिल्या दहा पत्रिकांमध्येच एका विचार करणाऱ्या तरुणाने पहिल्याच प्रश्नाबाबत हटकले. तो म्हणाला, 'कोण म्हणतं हे महा-राष्ट्रातलं पहिलं संमिश्र मंत्रिमंडळ आहे ? दादा-तिरपुडे हे देखील संमिश्र मंत्रिमंडळच होते.' अर्थात त्याची काँग्रेस, काँग्रेस आय, शेवटी एकच अशी कशी तरी समजूत घातली.

भोरला गेलो ते एका कारखान्यात गेलो. ग्रामीण भागातील कारखान्याच्या कामगारांच्या प्रतिक्रिया घ्याव्यात एवढाच हेतू. त्यासाठी कारखान्याच्या व्यवस्थापकांना 'परवानगी' घेण्यासाठी भेटलो; पण 'हे राजकीय काम आहे. आमच्या हद्दीत चालणार नाही,' असे ते म्हणाले.

'अहो, यात राजकीय काही नाही. हे सामाजिकच आहे.' आम्ही.

'नाही, पण आमच्या कारखान्यात विशिष्ट जातींनाच प्रवेश दिला जातो, असा आमच्यावर आरोप आहे. म्हणून यातून पुढे काही तरी खुसपटे निघतील. तेव्हा ते नकोच.'

या कारखान्यात जाणे अशक्य असल्याने जवळच्याच एका सूत-गिरणीत गेलो. तिथले कामगार अधिकारी श्री. गालाम यांनी सह-कार्य दिले. त्यांच्या एका सेवकाबरोबर कारखान्यातली खाती न् खाती फिरून आलो.

यात पहिल्या खात्यातल्या पहिल्या माणसाला प्रश्न विचारला, 'तुमचं नाव काय ?' त्यावर तो बापुडवाणा चेहेरा करून म्हणाला, 'अहो, पण अजून माझं लग्न व्हायचंय.' क्षणभर काहीच समजेना; पण लक्षात आल्यावर त्याला दिलासा दिला की, 'ह्याचा कुटुंब नियोजनाशी काहीही संबंध नाही. आम्ही पेपरवाले आहोत.' तेव्हा कुठे त्याने माहिती दिली.

या आणि पुढच्या अनेक खात्यांत लोक लाजून किंवा घाबरून पळून जायचे, अजिबात माहिती द्यायला तयार होत नव्हते.

काही काही खात्यात यंत्रांच्या प्रचंड घरघराटात घसा खरवडून प्रत्येकाला तीच माहिती सांगावी लागत होती. लोक भरून देत होते. आम्ही पुढे जात होतो.

प्रश्नपत्रिकेत वापरलेले 'जनता पक्षाची प्रतिमा डागळली / उजळली' किंवा 'लोकशाहीला उपकारक / मारक आहे' यासारखे शब्द या ग्रामीण कामगारांना समजत नव्हते आणि ते सोप्या पद्धतीने सांगितले, तर त्यामागचा हेतू योग्य तितका जाणवत नव्हता.

कार्यक्रमविषयक पर्यायातले ५ व ६ हे पर्याय ग्रामीण लोकांना

गुंगवून टाकत होतेच; पण शहरी (सु)शिक्षितांनाही प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याची सोय आणि एक गाव एक पाणवठा यामागच्या विचारसरणीतला, पार्श्वभूमीतला फरक समजत नव्हता.

'एका गावात एक पाणवठा आहेच, मग पिण्याच्या पाण्याची सोय म्हणजे आणखी काय करणार?' हे किंवा यासारखे प्रश्न वारंवार उपस्थित होत होते. यात विरोधाभास असल्याचे अनेकदा बोलून दाखवले गेले.

प्रश्नावलीतील या पर्यायात उघडउघडपणे ग्रामीण व नागरी जनतेतील विचारप्रणालीचा फरक स्पष्टपणे जाणवेल, अशा स्वरूपाचे प्रश्न होते. त्यामुळे या दोन गटांत वैमनस्य उघड होताना आढळले. नागरी भागातील लोकांनी शेतीउत्पन्नावर कर आणि सुशिक्षितांना रोजगार हमी यावर भर दिलेला जाणवला, तर ग्रामीण भागातील लोकांनी किमान वेतन ५ रु. आणि गावोगावी पिण्याच्या पाण्याची सोय याला प्राधान्य दिले.

'इंदिरा कांग्रेस बळकट होईल का?' या प्रश्नाचा फारसा डोळसपणे विचार झाल्याचे कुठेच जाणवले नाही. दोन्ही मतांच्या लोकांनी हा प्रश्न आंधळेपणानेच स्वीकारला. या घटनेमुळे मूळ कांग्रेस (रेड्डी–चव्हाण) फुटून कार्यकर्ते जनता आणि कां. (आय)मध्ये जाण्याची शक्यता व त्यासाठी हा प्रश्न याचा पुरेसा विचार झाला नाही.

'जनता पक्षाची प्रतिमा' हा तसे पाहता अनावश्यक किंवा अपुरा प्रश्न आहे. अशी बऱ्याच लोकांची समजूत झाल्याचे उघडपणे जाणवले. कारण थोडा-फार विचार करणारा प्रत्येक इसम या प्रश्नाला अडखळत होता आणि बऱ्याच जणांनी हा प्रश्न अनावश्यक आहे, जनता पक्षाच्या प्रतिमेचा इथे संबंध नाही, किंवा यावर आमची काहीच प्रतिक्रिया नाही अशी उत्तरे दिली. काहींनी 'जनता पक्षास प्रतिमाच नव्हती' 'जनता पक्षाची प्रतिमा कार्यक्रमशून्य— आक्रोशकांची होती व ती कायम आहे,' अशी स्वतंत्र मते मांडली.

या सर्व पाहणीत एक विशेष नवलाची गोष्ट जाणवली ती कुटुंब नियोजन 'विषयक. कांग्रेस विचाराचा माणूस उघडपणे कुटुंब नियोजनाचा पुरस्कार करीलच; पण वरील चार प्रश्नांवरून जो 'जनता' विचारसरणीचा आहे, हे स्पष्टपणे दिसत होते अशा असंख्यांनी, ग्रामीण-नागरी भेद न मानता याचा पुरस्कार केला ज्या लोकांनी याच कारणासाठी इंदिरा सरकारचा पराभव केला त्याच धोरणाला त्यांनी बहुमताने उचलून धरावे हे नवलपूर्ण वाटते. ◻

## चार : जयदेव डोळे

मी खेड (राजगुरुनगर) आणि खर्पुडी या दोन गावात जनमतकौल घेणार होतो. त्यापैकी खर्पुडी गावात लिफ्ट इरिगेशनबाबत नोटिसा आल्यामुळे खेड्यात तीच चर्चा आणि काळजीचे वातावरण. त्यामुळे या कार्यक्रमाची कोणी दखल घ्यायचा प्रयत्नच केला नाही. त्यातून खेड्यात बेकारांची संख्या खूपच, 'आम्हाला काम मिळवून देणार असाल तरच फॉर्म्स भरू,' असे ऐकायला मिळाले. एकूण निराशेची आणि अपेक्षाभंगाची मन:स्थिती. म्हणून खर्पुडीत केवळ चारच फॉर्म्स भरायला मिळाले.

खेड (राजगुरुनगर) मध्ये फॉर्म पहाताच तोंड वाकडं करणारे आणि आम्ही भरत नाही, म्हणणारे बरेच भेटले. काही जणांनी केवळ भीतीपोटी फॉर्म भरायचे टाळले. फॉर्म बघून, तो पूर्ण वाचून, भरून परत करण्याचा उत्साह मात्र बाकीच्या सर्वांनीच दाखविला.

फॉर्म पूर्ण करता करता आणि त्या अगोदर वाचताना लोकांच्या तोंडच्या प्रतिक्रिया खूपच बोलक्या होत्या. प्रश्न विचारल्यावर मात्र प्रत्येकाने अगदी कळकळून आणि पूर्ण जबाबदारीने, जाणिवेने आपली मते पुढे मांडली. राजकीय, सामाजिक जाणीव असलेले बरेच लोक त्यांच्या प्रतिक्रियांची बाजू घेत आणि तसेच व्हायला पाहिजे, असे बजावीत.

काही जणांना हे जनमतकौल आणि प्रश्न फार त्रोटक स्वरूपाचे भासले. काहींनी फार लवकर जनमत घेत आहात, असे सांगितले. फॉर्म भरणाऱ्याला बोलकं करूनच त्याच्या खऱ्या प्रतिक्रिया आणि मतं समजली. 'काय लचांड आहे' किंवा 'काय कटकट' वगैरे कुठेच काही ऐकायला मिळाले नाही.

एकंदर सर्व सुशिक्षित, राजकीयदृष्ट्या जागरूक असलेले नागरिक या सर्व प्रकारात उत्साही आणि मतप्रदर्शन उघडपण करणारे व आपल्या हक्कांची जाणीव असलेले दिसले.

दिलेल्या पाच प्रश्नांपैकी पहिल्या प्रश्नास जवळजवळ सर्वच (९०%) प्रतिक्रिया पवार मंत्रिमंडळ सत्तेवर येणे हे योग्य वाटते, अशा प्रकारच्या दिल्या गेल्या. अतिशय कट्टर 'जनता' विरोधकांनी मात्र चारही प्रश्नांची उत्तरे नकारात्मक दिली.

पवार मुख्य मंत्रिपदासाठी लायक नसताना त्यांना ते पद देण्यात आले हे योग्य झाले नाही, असेही बऱ्याच जणांनी म्हटले. संमिश्र मंत्रिमंडळात 'जनता'चाच मुख्यमंत्री पाहिजे होता असाही हेका काही जणांनी धरला. मात्र केवळ सत्तेसाठी 'जनता' वाल्यांनी शरद पवारांशी हातमिळवणी केली, सत्तालोलुपतेचे गलिच्छ प्रदर्शन केले, म्हणूनही अनेक जणांना पहिला प्रश्न अयोग्य वाटला.

तरी बहुमत हे 'योग्य वाटते' यावरच गेले.

दुसऱ्या प्रश्नाबद्दल फारसा कोणी विचार न करताच उपकारक आहे, असे मांडून टाकले. लोकशाहीला उपकारक म्हणजे काय, हे कोणी सांगू शकले नाही; पण मारक आहे, असं लिहिणाऱ्यांनी मात्र जोरदारपणे आपली मते मांडली. संमिश्र मंत्रिमंडळ ही कल्पना बहुधा कोणालाच पटलेली दिसत नव्हती आणि त्यातून 'जनता'कडे १०० आमदार असूनही त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपद नाही आणि केवळ सदतीसजण घेऊन आलेल्या पवारांना मात्र ते दिले जाते, हे कोणालाच आवडले नाही, असे बहुतेकांनी स्पष्ट केले.

तिसऱ्या प्रश्नाबद्दल मात्र इंदिरा कांग्रेस बळकट होणार नाही, असेच मत पुढे आले. बऱ्याच जणांना या प्रश्नाची रचना गोंधळात टाकणारी भासली आणि त्यामुळे उत्तरेही चुकीची दिली गेली. इंदिरा कांग्रेसबद्दल विशेष कोणी बोलले नाही आणि कोणाला गरजही वाटली नाही. त्या पक्षातल्या लोकांनी आणि 'जनता' विरोधकांनी मात्र कांग्रेस (इं.) बळकट होईल असेच लिहिले. एक म्हणाला

(तो काँग्रेसचा (इं.) तालुकाध्यक्ष होता) की, या पक्षाचे सभासद आता विरोधकात बसतील. इतके दिवस सत्तेवर असताना त्यांना चान्स मिळाला; पण त्याचा उपयोग झाला नाही. आता त्यांना कामे, कार्यक्रम राबवावेच लागतील ही भावना.

काही जण म्हणाले 'आता काँग्रेस (इं.) ला जनता आणि काँग्रेसची माणसे फोडायला सोपं झालं.' का? कसे? हे मात्र सांगू शकले नाहीत.

चौथ्या प्रश्नात अगदी स्पष्ट आणि रोखठोक प्रतिक्रिया सामोऱ्या आल्या. ज्यांनी जनता पक्षाची प्रतिमा उजळली असं लिहिलं त्यांचे त्या पक्षाशी निश्चित असे संबंध होते, त्या पक्षाबद्दल त्यांना बरेच वाटत होते, म्हणून त्यांनी असे लिहिले.

स्वातंत्र्यापासून तीस वर्षे एक ती एकच काँग्रेस राज्य करायची. आता या ना त्या मार्गाने प्रथमच महाराष्ट्रात काँग्रेसेतर सरकार झाले आहे हेच, सर्वांना विशेष आणि कौतुकाचे वाटते. त्यातून जनता पक्षात विलीन झालेल्या पाचही पक्षांशी निगडित असलेल्या, बांधिलकी असलेल्या लोकांना तर ही फारच अभिमानाची गोष्ट वाटते. सर्वांच्या अपेक्षा आणि प्रेम पुन्हा उफाळून आले आहे.

ज्यांनी डागाळली, असे लिहिले त्यांना ही पवार-गटाशी झालेली हातमिळवणी मुळीच पसंत नाही. सत्तेची हाव आणि त्यासाठी केलेली मरमर जनताप्रेमींना गलिच्छपणा वाटतो. लाजेने आमचीच मान खाली जाते, ह्यांनी मात्र काहीही करावे, हा सूर बऱ्याच जणांनी व्यक्त केला. एकंदर पक्षाची आणि पक्षनेत्यांची केवळ नैतिक, प्रतिष्ठेची बाजूच विचारात घेऊन आपण मत मांडतोय ह्याची कोणालाच कल्पना नसावी. नीतिमत्ता, अस्मिता अक्षरशः पायदळी तुडविल्या गेल्या आणि सत्ता हस्तगत केली ही भावना 'डागाळली आहे' असे मत मांडणाऱ्यांची झाली.

फार थोड्यांना हा प्रश्न महत्त्वाचा वाटला नाही. त्यांनी काहीच खोडले नाही. डागाळण्याचा अथवा उजळण्याचा प्रश्नच येत नाही, असे ते म्हणतात; पण बहुमत 'उजळली आहे' यालाच मिळाले.

शेवटचा पाचवा प्रश्न. ह्यातच सर्वांची कसोटी होती असं मला वाटतं. सहा कार्यक्रमांपैकी कोणत्याही तीन कार्यक्रमांना प्राधान्य द्यायचं होतं. बहुतेकांची खरी मतं, प्रतिक्रिया, जडण-घडण, अपेक्षा व्यक्त होत गेल्या त्या या प्रश्नामुळंच.

पाच-दहाच सोडल्यावर एकाचेही मत सारखे नाही.

सुशिक्षितांसाठी रोजगार हमी मात्र सर्वांनी मान्य केली. सक्तीचे कुटुंब नियोजन साठ टक्क्यांहून जास्त लोकांनी खोडून टाकलं. कदाचित सक्तीच ह्या शब्दाचा तो परिणाम अथवा गैरसमज असावा. मात्र विवाहित, मध्यमवयीन, स्त्रिया, प्रौढ आणि मिसरूड फुटलेल्या तरुणांनी मात्र 'सक्तीचं' कुटुंबनियोजन हवे, हे मत दिले. अर्थातच तीन मुलं झाल्यानंतर, कायदा करून जास्त झाल्यास शिक्षा अथवा कर. असे प्रयोग आणि नियमांच्या सहाय्याने ते झालंच पाहिजे असं सक्तीचं ठाम मत. केवळ एका माणसाच्या सक्तीने आणि क्रूरतेने एका चांगल्या कार्यक्रमाचं वाटोळं झालं आणि त्याविषयी लोकांत निष्कारण भीती आणि तिरस्कार रुजला गेला, हे कोणी लक्षात घेतलेलं दिसत नाही. समजूतदारपणे कोणीच विचार करून या कार्यक्रमाला प्राधान्य दिले नाही.

किमान वेतन-रुपये पाच हे प्राधान्यक्रमाप्रमाणे दुसऱ्या क्रमावर पोचले, इतकी त्याची योग्यता पटली. ते वाढविण्याचा कल बऱ्याच जणांचा आहे. तशी अपेक्षा पण नव्या सरकारविषयी आहे.

शेतीउत्पन्नावर कर हा प्रश्न सर्वांत खालच्या क्रमांकावर गेला. ज्यांची मते मी घेतली ते सर्वच या ना त्या कारणाने शेतीशी संबंधित असल्याने हा चौथा कार्यक्रम नकोच, असे सर्वांनी सांगितले. अगोदर उत्पन्नच नाही, त्यात हा कर कशाला आणि कुठला, असाच विचार प्रत्येकजण कळवळून सांगत होते. 'अगोदर भाव बांधून द्या; शेतीमालाची, खतांची, अवजारांची किंमत खाली आणा, मग उत्पन्न वाढल्यावर (कधी वाढेल याची खात्री कोणास नाही.) कर बसवायचा तर बसवा. वाटल्यास शेतकरीच स्वखुशीने तो भरावयास तयार होईल.'

कर फक्त मोठ्या, सधन शेतकऱ्यावरच बसवावा असे हा कार्यक्रम सुचविणाऱ्यांनी सांगितले. कारण त्यांची तुंबडी भरली जाते तिला कुठे बांधच रहात नाही. गरीब शेतकरी मात्र करापायी भिकेला लागेल, अशी भीती सर्वांनी व्यक्त केली.

जेवढे शेतकरी भेटले त्यांनी पूर्ण निराशेचा सूर काढला. एकालाही कर नको आहे. मात्र उत्पन्न वाढविण्याची आणि त्यासाठी उपाययोजना करण्याची अतिशय तीव्र इच्छा प्रत्येकाला आहे. परिस्थिती फारच हलाखीची असल्याने शेतकऱ्यांकडून खरी आणि कळकळीची पोटीची हकीकत ऐकायला मिळाली; पण कर कोणालाही नको आहे.

प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय हा कार्यक्रम सर्वसामान्यपणे प्रत्येकानेच सुचविला. अशी सोय असल्यानंतर 'एक गाव एक पाणवठा'ची गरज कोणाला वाटली नाही; पण ज्यांनी ह्या कार्यक्रमाला प्राधान्य दिले, त्यांच्यापुढे केवळ पाणी मिळण्याची सोय असावी, प्रत्येकाला पाणी मिळावे अशीच कल्पना होती. हा प्रश्न शासकीय पातळीवरच सुटेल अशी इच्छा सर्वांनी व्यक्त केली. एकदा का पाण्याची सोय झाली तर एक गाव एक पाणवठा वगैरेची गरज लागणार नाही, सर्वांची अशीच प्रतिक्रिया होती.

शेवटचा प्रश्न होता 'एक गाव एक पाणवठा' याचा. ज्यांना या सामाजिक प्रश्नाची खरीखुरी जाण आहे त्यांनीच प्रत्येक गावात या कार्यक्रमास प्राधान्य द्यावे, असे सुचविले. जातीय तेढ पूर्ण नष्ट करण्यासाठी हा कार्यक्रम पाहिजेच, असे सर्वांनी सांगितले. मात्र केवळ शासकीय मार्गाने हा प्रश्न सुटू नये, प्रत्येकाचा सहभाग हवा, असेही सांगितले.

ज्यांनी 'पिण्याच्या पाण्याची सोय' आणि 'एक गाव एक पाणवठा' असे दोन्ही कार्यक्रम सुचविले त्यांना प्रश्न विचारल्यावर त्यांनी या कार्यक्रमाची अतिशय गरज आहे, असे सांगितले; पण असे सांगणारे अल्पच भेटले. हा प्रश्न सामाजिक आहे, आणि तो सुटण्याची अतिशय गरज आहे, असे पाण्याचे दोन्ही कार्यक्रम सुचविणाऱ्यांनी सांगितले.

## काँग्रेसेतर सरकार झाले हेच विशेष आणि कौतुकाचे !

या कार्यक्रमाचे महत्त्व न जाणणाऱ्यांनी मात्र फारसा विचार न करता प्राधान्य दिले नाही. केवळ पाण्याची सोय झाल्यावरच सगळे प्रश्न सुटतील अशीच सर्वांची भावना दिसते.

एकूण सर्व प्रश्नांची प्रतिक्रिया बघता लोकांना जनता पक्षाबद्दल अपेक्षा अजूनही आहेत. नव्या मंत्रिमंडळामुळे त्या अजून वाढल्या आहेत. पक्षातील नेतृत्व आणि कार्यकर्ते यांच्याबद्दलचा विश्वास वाढतो आहे, असेच आढळून आले.

जनमानसात एक प्रतिमा आणि विश्वास निर्माण करण्याची फार मोठी संधी जनता पक्षाला मिळाली आहे. जनता ही नव्या मंत्रिमंडळाविषयी उत्सुक आहे आणि कार्यक्रम-अंमलबजावणीची, सुधारणेची वाट बघत आहे. ◻

## पाच : अतुल कुलकर्णी

भारतीय व लोकशाहीप्रेमी नागरिकांनी जनमतकौल हे फॉर्मस् भरून द्यावेत अशी अपेक्षा व इच्छा होती. फॉर्मस् भरून होताना पुढील गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या.

आपण एका जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही राष्ट्रातील नागरिक आहोत, आपण मतस्वातंत्र्याचे आणि विचारस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहोत असं म्हणतो; परंतु 'आपण जरा ही प्रश्नपत्रिका भरून देता का ?' असं विचारलं तर हेच महाभाग 'मग हे कशाला ? मग आमचं नाव कशाला ? आणि पत्ता काय करायचाय ? याचा आम्हाला काही त्रास व्हायचा नाही ना ? आमची नोकरी जाणार नाही ना ? तुम्ही आपला तुमचा पत्ता द्या आधी, म्हणजे काही झालं तर तुम्हाला आम्ही धरणार. तसं असेल तरच आमचा फॉर्म घ्या !' अशी टाळाटाळ करतात.

या भित्रट लोकांना पाहिल्यावर मार्च १९७७ मध्ये मतपेटीद्वारा जी क्रांती भारतात झाली ती खरीच झाली का ? हा प्रश्न पडतो; दुसरा आणि फार महत्त्वाचा प्रश्न म्हणजे १९७७ च्या मार्चमध्ये शहाणी झालेली हीच भारतीय जनता फेब्रुवारी १९७८ मध्ये आपले शहाणपण परत कुठं हरवून बसली ?

एका राष्ट्रीकृत बँकेत मी फॉर्मस् भरून घेत होतो. एका अधिकाऱ्याला मी फॉर्म भरावयास दिला – 'कृपया आपण ही प्रश्नावली भरून देऊ शकाल काय ?'

'कशासंबंधी आहे ?'

'महाराष्ट्रात नुकतंच झालेलं सत्तांतर !'

'म्हणजे हे तर राजकारण. अहो, आम्ही सरकारी नोकर समजले जातो. आम्ही आमचे राजकारणासंबंधीचे विचार मांडू शकत नाही.'

ह्या सद्गृहस्थाला बहुधा हे माहीत नसावं की, सर्वप्रथम आपण माणूस आहोत, भारतीय आहोत, लोकशाही मानणारे आहोत. आपल्याला मतस्वातंत्र्य आहे आणि नंतर आपण सरकारी नोकर आहोत.

कुणाच्या तरी हुकमाप्रमाणे काम करायचं, एवढंच आम्हाला माहीत असल्यामुळं आम्ही बहुधा स्वतःच डोकं चालविण्याचा विचारच करीत नाही, असंच यावरून दिसतं.

तसाच दुसरा अनुभव आला तोही असा अजबच.

एका सरकारी ऑफिसमध्ये मी फॉर्मस् भरून घेत होतो. इतक्यात ऑफिसमधल्या एका माणसाने त्यांच्या युनियन लीडरला विचारलं – 'अहो, आम्ही हे भरून देऊ का ?'

मग 'त्या' लीडरने ती प्रश्नपत्रिका वाचली आणि सांगितलं, 'हो द्या. काही हरकत नाही !'

नशीब त्याने काय लिहा तेही सांगितलं नाही.

आज आपण सर्वत्र ऐकतो की, स्त्री-पुरुषांना समान हक्क पाहिजेत; परंतु प्रत्यक्षात मात्र याच स्त्रिया कर्तव्याच्या बाबतीत पुरुषांपेक्षा ५० टक्के मागे असतात.

'आपण हा फॉर्म भरून द्याल का ?'

'नाही हो दुसऱ्या कुणाला तरी विचारा ना.'

किंवा

'अहो, तो फॉर्म देता ना ?'

'नाही हो. अजून व्हायचाय. तुम्ही असं करता का, उद्या किंवा परवा येता का न्यायला ? म्हणजे तोपर्यंत बहुधा भरून होईल !'


बहुतेक जणांना शरद पवार यांचं मंत्रिमंडळ आलं ह्याचा आनंद झाला नसला तरी बरं निश्चितच वाटलेलं दिसतंय. बहुधा वसंतदादासारखा संधिसाधू माणूस गेला हेच त्या मागचं कारण असावं. ◻

## सहा : शेखर केळकर

राजकारण हे रंग बदलणाऱ्या सरडयासारखं असतं, असं म्हणतात ते काही खोटं नाही. यात आजचा शत्रू उद्याचा मित्र असू शकतो किंवा आजचा मित्र उद्याचा शत्रू. नुकताच महाराष्ट्रात घडलेला सत्ताबदल त्या दृष्टीने खळबळजनक आणि कुतूहलजनक होता. लोकांच्या मताचा कौल कोणत्या बाजूने आहे, या दृष्टीने माणूस साप्ताहिकाने 'जनमत कौल' अजमावयाचे ठरविले. तशा अर्थाचे चार प्रश्न निश्चित केले. त्यांना फक्त दोनच पर्याय ठेवले. आणि पाचव्या प्रश्नात दिलेल्या सहा कार्यक्रमांपैकी कुठल्या तीन कार्यक्रमांना प्राधान्य द्यावयाचे, याबाबत लोकमत अजमावयाचे ठरविले.

जनमतकौलाची 'ती' पत्रके भरून घेताना विविध अनुभव आले. देहूरोड–स्टेशनजवळचे किवळे नावाचे छोटे गाव. त्या छोटया–दोनशे–तीनशे उंबरा असलेल्या गावात देखील या नुकत्याच झालेल्या घटनेबद्दल औत्सुक्य होते. काहींना नीट लिहिता–वाचता येत नव्हते, पण बातमी त्यांना नीट कळली होती. प्रत्येकालाच त्या विषयावर बोलावेसे वाटत होते. शेवटी त्यांना समजावून द्यावे लागले की, 'ही पत्रके कोणत्याही पक्षाच्या वतीने आम्ही भरून घेत नाही. याबाबत भीती बाळगण्याचे काहीच कारण नाही. या उत्तराने तुमचा पक्ष वगैरे काही कळणार नाही. द्या भरून !' इत्यादी इत्यादी. तेव्हा कोठे किवळेवासीय मंडळी 'जनमतकौल' भरून द्यायला तयार झाली.

सातारा शहर व त्याचा आसपास 'राजकीय मतांच्या' दृष्टीने विशेष महत्त्वाचा. तेथे ह्या घटनेबद्दल कुतूहल असणे साहजिकच होते आणि तिथे व्यक्त होणारी मतेदेखील 'त्या दृष्टीने' महत्त्वाची.



आतां अधिकाधिक लोक

# राष्ट्रीय विकास बाँडमार्फत

बचत करणें पसंत करतात

रु. 100
पांच वर्षात
165 रु.
होतात

कां ? कारण ते सरकारी कर्जरोखे असून सर्वोत्तम आहेत. एकाद्याची सांठलेली रक्कम
किंवा बोनस, ग्रॅच्युइटी, विम्याचे मिळालेले पैसे, परत मिळालेल्या रकमा, पगारांतील
थकबाकी वगैरेसारख्या एकदम हातीं आलेल्या पैशाच्या गुंतवणुकीचा तो आदर्श मार्ग आहे.
सुलभ कार्यपद्धती, 13 टक्के सरळ व्याजासारखा भरघोस मोबदला आणि इतर फायद्यांमुळें
ही योजना अधिकच आकर्षक झाली आहे. बचत करणारांची संख्या त्यामुळे हळूहळू वाढत
आहे. आपण त्यापैकी एक आहात काय ? निश्चितच असाल.

### कोण खरेदी करु शकते ?

( कोणीहि—पुरुष, स्त्री, विद्यार्थी, वेतनधारी,
सेवानिवृत्त, शेतकरी, स्वतःचा व्यवसाय
करणारे. वय कांहीहि असो. एकट्याच्या
अगर संयुक्त खात्यांवर )

### किती खरेदी करता येतात ?

कांहीहि मर्यादा नाही कितीहि खरीदा
कितीहि किमतीचे. हे बाँड सोयीच्या
3 रकमांचे आहेत. 10, 100 व 500 रु.

### कोठें खरेदी करावेत ?

देशभरांत कोठेहि-टपाल कचेऱ्यांत किंवा कोणत्याहि सार्वजनिक क्षेत्रांतील बँकेत.
यापैकी कांहीतरी तुमच्या जवळपासच आहे.

### कसे खरेदी करावेत ?

विकणाऱ्या कोणत्याहि कचेरींत जा. या कामासाठींचा फॉर्म भरा व तो रकमेसह तेथें
द्या लगेच तुम्हाला बाँड (बाँड्स) मिळतील.

### करविषयक फायदे

(इतर मार्गांनी मिळणाऱ्या व्याजासह) 3000 रु. पर्यंतच्या व्याजावर प्राप्तीकर
माफ—मुदतपूर्तीनंतर पैसे देतांना कर कापून घेतला जाणार नाही. प्राप्तीकर
हिशोबासाठीं व्याज दरवर्षी जमा होतें.
भांडवली नफा सहा महिन्यांच्या आंत रोख्यांत गुंतविल्यास प्राप्तीकरात संपूर्ण सूट


### इतर सवलती

नॉमिनेशन व एका टपाल कचेरींतून अथवा बँकेतून इतरत्र बदलण्याची सवलत.

राष्ट्रीय विकास बाँड मार्फत
तुमचे पैसे
अधिक भराभर वाढूं द्या

राष्ट्रीय बचत संघटना
पोस्ट बॉक्स नंबर 96, नागपुर-440001

davp 79/173



साताऱ्याकडे जाताजाताच एस्. टी. त 'मते' भरून घ्यायला सुरुवात केली आणि शेजारी बसलेल्यानीच पहिला धक्का दिला. मी स्वतः व इतरांनी त्यांना समजवण्याचा बराच प्रयत्न केला; पण त्यांचा नकार कायमच. त्यांचा हेका एकच, 'नाव कशाला हवे ? आमच्या नोकरीवर गदा आली तर ? खरं तर ह्या जनमतकौलाबरोबर 'माणूस'चा एक एक अंक फुकट दिला असता तर ह्या कौलाला काही थोडेफार 'वेटेज' आले असते.' आजूबाजूच्या लोकांनी 'माणूस सरकारी खात्यातला असावा' असा त्याच्या तोंडावर शेरा मारला. पत्रके बऱ्याच जणांनी उत्साहाने भरून दिली आणि गाडीतच 'राजकारणावर चर्चा सुरू झाली.'

खुद्द सातारा शहर व त्याचा औद्योगिक भाग ह्यात वेगवेगळे अनुभव आले. औद्योगिक भागात सगळेजण मत द्यायला तयार होते. फक्त मालकांनी एक–दोन मिनिटे वेळ घालवल्याबद्दल ओरडू नये म्हणून 'मालकांची परवानगी नाही' असे सांगण्यात येत होते; पण बहुतेक वेळा मी आधी मालकांकडूनच भरून घेत होतो. काही मालक 'लंच टाइम'ला या असे सांगत होते, काही परवानगी देत होते. एका कारखान्यात मालक हजरच नव्हते. मालक ओरडतील ह्या भीतीने कामगार म्हणत होते, 'मालक रागावतील. आमच्या इथे असं काही मालकांना चालत नाही.' वगैरे वगैरे. मी चिकाटीने, 'ह्या कारखान्यातल्या लोकांनी दिली आहेत. अमुकने दिले आहे,' असं म्हणता म्हणता त्यांच्या मालकांनीही 'कौल' भरून दिल्याचे सांगितले. मग साऱ्यांनीच आपापली मते भरून दिली. तेव्हाच नेमके 'मालक' उपस्थित झाले; पण ते काही ओरडले नाहीत.

साताऱ्याच्या आजूबाजूला हिंडताना असं आढळलं की, नीट लिहिता–वाचता न येणारे, पूर्ण अशिक्षित लोक देखील आपले मत मांडायला तयार होते. फक्त त्यांना नीट समजावून सांगावे लागत होते. तेव्हा त्यांना थोडक्यात 'हे सारे कशासाठी ?' हे अतिशय सोप्या भाषेत सांगितले. प्रश्नांची फोड करून सांगितली. मग ते उत्तरे द्यायचे. 'चांगलंच झालंय की हो' 'बरं झालं या.' मग त्या प्रश्नापुढे दिलेल्या उत्तरातले 'अयोग्य' खोडायचे अशा पद्धतीने देखील काही 'मते' भरून घेतली.

एका झोपडीवजा हॉटेलातल्या साऱ्यांनी एकजात नकार दिला. त्यांचं म्हणणं साधं आणि सरळ होते, 'आमच्या मतावर सरकार बदलत नाही किंवा हे फॉर्म भरून दिल्यानं मंत्री ठरणार नाहीत. काही उपयोग आहे का हे भरून ?'

साताऱ्यातल्याच एका अशिक्षिताची प्रतिक्रिया अधिक बोलकी होती. त्याने 'फॉर्म' वगैरे भरून दिला म्हणजे घेतला; पण पुढे गप्पा मारताना तो म्हणाला, 'फार घाई होतीया. आताशिक तर तै मंत्री होऱ्याती. जरा त्यनला काम करून द्या, त्यांचं काम आमाला पाहू द्या. मागच्यासारखंच त्ये वागणार आहेत की काय ह्ये पहायल जरा टाइम जायला पाहिजे, मग हे भरून घेतलं असतं तर...

खरंच खेड्यापाड्यातला मतदारसुद्धा जागृत झाला आहे. आपली मते मोकळेपणाने मांडू लागला आहे; बोलू लागला आहे. जनमतकौलाच्या निमित्ताने हे सारे अनुभवायला मिळाले, हेच विशेष.

□





**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य २० रुपये**

## तीन मुलाखती : पृष्ठ ८ वरून

'लोकशाही शरद पवार किंवा जनता पक्ष दोघेही तारू शकत नाहीत आणि इंदिरा गांधी आल्या तर त्याही लोकशाही मारू शकत नाहीत. कारण आज लोक हालचाली करताहेत; वेगवान गतीने पुढे जात आहेत.'

'माझा प्रश्न असा– आज भांडवली अर्थव्यवस्थेची कोंडी झाली आहे. या परिस्थितीतच एकाधिकारशाहीची बीजे नाहीत का? येथील सत्ताधारीवर्गाला एकाधिकारशाही पद्धतीने आर्थिक परिस्थितीवर व त्यामुळे निर्माण होणाऱ्या जनतेच्या चळवळीवर नियंत्रण ठेवण्याची गरज नजीकच्या काळात पुन्हा भासणार आहे की नाही? अशा वेळी ही गरज कोणत्या राजकीय घटकातर्फे राबविली जाईल? त्यासाठी योग्य प्रवृत्ती, व्यक्ती, संघटना कोणती?'

'सध्या सत्ताधारी वर्गाचा असा काही जाणीवपूर्वक प्रयत्न चालला आहे, असे मला वाटत नाही आणि सद्य:परिस्थितीचे जर संपूर्ण चित्र नजरेसमोर आणले तर उलट अरेरावी शक्ती स्वत:चे संघटन करताना जनता पक्षातच ठळकपणे दिसत आहेत. जनता पक्षाचा विजय झाल्याबरोबर ग्रामीण भागातील प्रबळ शक्तींना आपले राज्य आले असे वाटतेय् व तसा व्यवहार करायला सुरवातही त्यांनी केलीय्.'

'अशा रीतीने संघटनेचा प्रयत्न इंदिराबाईंचा नाही का?'

'तशा प्रकारच्या फॅसिस्ट शक्ती इंदिराबाईंच्या मागे जमताना दिसत नाहीत. त्या लोकांना आपल्यामागे येण्याचे आवाहन जेव्हा करतात तेव्हा जीवनाच्या समस्या घेऊनच त्या त्यांना जमवतात. कोणत्याही विकृत विचारसरणीचा आधार घेऊन नव्हे.'

'पण त्याचबरोबर त्या आणीबाणीचे समर्थनही करतात. शिवाय त्या ग्रामीण भागातील असंघटित दलितसमाजाला आवाहन करतात, ज्यांनी संघटनास्वातंत्र्याचा अनुभवच घेतलेला नाही.'

'पण मी आताच सांगितले की, लोक जर हालचाली करायला लागले, तर इंदिराबाईंनासुद्धा एकाधिकार पद्धतीने जाता येणार नाही.'

'शरद पवारांनी १९७७ साली कॉंग्रेसचे विभाजन होण्यापूर्वी व्यक्तिगत जबाबदारीवर डाव्या पक्षांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. तुम्हालाही ते भेटले होते. त्या वेळी त्यांची भूमिका काय होती?'

'सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते लाल निशाणशी पक्षपातळीवर बोलणी करण्यास आले नव्हते. दत्ता देशमुख या व्यक्तीशी त्यांनी बोलणी केली. तीही कॉंग्रेस पक्षातर्फे नव्हे. स्वत:च्या वैयक्तिक जबाबदारीवर. त्या वेळची परिस्थितीसुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. इंदिराबाईंची हालचाल तेव्हा सुरू झाली नव्हती त्या शक्ती म्हणून अस्तित्वात नव्हत्या. त्या वेळी शरद पवारांनी सांगितल्याप्रमाणे कॉंग्रेसमध्ये तीन प्रवाह होते. एक प्रवाह सरळ सरळ केंद्रीय मंत्रिमंडळाशी जमवून घेण्याच्या मन:स्थितीत होता. दुसरा प्रवाह जनसमूहांना संघटित करण्याचा वसा घेतलेल्या मंडळींचा होता. त्यांना डाव्यांशी एकजूट करून जनसमूहांच्या उत्थापनाच्या कार्यास लागायची इच्छा होती. मधल्या प्रवाहाची साधारणपणे दुसऱ्या प्रवाहाला साथ होती. जनसमुदायांपासून दूर पडण्याची भीती त्यांना वाटत होतीच; पण पुढाकार घ्यायची त्यांची तयारी नव्हती. महाराष्ट्रातील निवडणुका व्हायच्या होत्या. तरीसुद्धा शरद पवारांच्या प्रस्तावामध्ये निवडणुकीच्या युतीचा उल्लेख नव्हता. लांब पल्ल्याच्या जनसमूहांच्या हालचाली संघटित करण्याचा आराखडा तयार करण्याची त्यांची इच्छा होती. कॉंग्रेस पक्षाचे नैतिक बळ खचले असल्याने जनता त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देणार नाही, म्हणून डाव्या पक्षांशी आघाडीची गरज त्यांना तीव्रतेने वाटत होती. विशेषत: सांस्कृतिक मक्तेदारीविरुद्ध लढण्याची गरज. त्यांच्या बोलण्यात नोकरशाहीच्या पुनर्रचनेचा प्रश्न वारंवार येत होता. केंद्रामध्ये जे राजकीय बदल झाले, त्यामुळे नोकरशाहीतील आक्रमक वृत्तीला उठाव लाभत असल्याचे त्यांनी नमूद केले. उदाहरण म्हणून त्यांनी खालील घटना सांगितली. सरसंघचालक देवरसांनी इंदिरा गांधींना तुरुंगातून लिहिलेली पत्रे सादर करावीत म्हणून मागणी येत होती. त्या वेळी ती पत्रे गायब झाल्याचे लक्षात आले. ती पत्रे नोकरशाहीकडून गायब झाली असण्याची शक्यता आहे. मात्र या सगळ्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस पक्षांतर्गत जो झगडा त्यांनी द्यायला हवा होता तो दिलेला दिसत नाही व 'डाव्यांशी एकजूट करू या' या शक्तीचे वर्चस्व कमी झालेले दिसते. तसेच इंदिराबाईंच्या बाजूला जाऊ इच्छिणारा मोठा विभागही त्या वेळी त्यांना दिसला नाही. आज त्याच जनता पक्षाशी एकजूट करण्याचे पाऊल त्यांनी टाकले आहे. हे तत्त्वशून्य राजकारण आहे. लोकशाहीला वाचविणे वगैरे सर्व नंतरचे समर्थन आहे.'

'तुम्ही मध्यंतरी निवडणुकीत भाग घेण्याची शक्यता असल्याचे वृत्तपत्रात आले होते. त्यामागची भूमिका काय होती?'

'आम्ही नेहमीच समुदायांची वृत्ती लक्षात घेऊन निवडणुकीत भागीदारी करत असतो. निवडणूक हे आंदोलन म्हणून वापरत असतो. ५२–५७ मध्ये आम्ही भागीदारी केली होती. १९७७ चे वैशिष्टच हे होते की, सर्वच पक्षांचा लोकांशी संबंध आणीबाणीमुळे तुटला होता आणि तरीसुद्धा लोक स्वत:च हालचाल करू लागले होते. या निवडणूका या लोकांच्या होत्या, पक्षांच्या नव्हत्या. या निवडणुकांत जनता पक्षाला मतदान झाले ते केवळ दुसरा पर्याय नव्हता म्हणून. ही लोकांची हालचाल पाहूनच आम्ही निवडणुकीत भाग घेण्याचा निर्णय घेतला होता; पण योग्य प्रकारे त्या निवडणुकांना आंदोलनाचे स्वरूप येऊ शकले नाही व आम्ही प्रत्यक्षात निवडणुकीत उतरलो नाही. मात्र सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रातील पुरोगामी घटकांनी योग्य जुळणी केली असती तर, विशेषत: दोन निवडणुकांचा अनुभव गाठी असताना, लोक निश्चित बाजू घ्यायला पुढे आले असते आणि बहुमत मिळाले असते. आजच्यासारखी विस्कळितपणाची अवस्था राहिली नसती.' □

# विद्यार्थी आणि सत्तान्तर : एक पाहणी

मुकुंद संगोराम

शिक्षित विद्यार्थ्यांमध्ये राजकीय घडामोडींच्या संदर्भात असलेल्या जागृतीचा अभ्यास पुण्यातील 'लोक जागरण समिती' या नव्यानेच स्थापन झालेल्या संस्थेने महाराष्ट्रातील सत्तांतराच्या बाबतीत घेतलेल्या पाहणीत करण्यात आला.

पुण्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची 'महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती' या विषयावरील प्रश्न पत्रिका भरून घेऊन पाहणी करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थी हा 'लिहिता वाचता' असतो, विचार करण्याची कुवत (कमी प्रमाणात) असली तरी 'मास मिडिया'तून मिळालेले निरनिराळ्या प्रकारचे ज्ञान त्याची विचार सरणी घडवित असतो.

म्हणूनच काही प्रमाणात महाविद्यालयीन विद्यार्थी समाजातील एका विशिष्ट स्तरांचे प्रतिनिधित्व करतो. तो 'विचार' करतो की नाही हा प्रश्न वेगळा !

महाराष्ट्रात झालेल्या सत्तांतरामुळे समाजातील निरनिराळ्या थरातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटणे साहजिक होते. त्यातील ही विद्यार्थी वर्गाची प्रतिक्रिया. 'माणूस' ने घेतलेल्या 'जनमतकौला' बरोबरच हीही पहाणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांना एकूण १४ प्रश्न विचारले होते. प्रश्नांना पर्याय देऊन कुठलाही एक पर्याय निवडण्यास सांगितले होते. या प्रश्नपत्रिका भरून देताना विद्यार्थ्यांनी खूपच प्रतिसाद दिला ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. एकूण २५८ विद्यार्थ्यांची पाहणी करण्यात आली. पैकी १७२ विद्यार्थी व ८६ विद्यार्थिनी होत्या. कॉमर्स, आर्टस, सायन्स, लॉ, इंजिनिअरींग, मेडिकल अशा निरनिराळ्या शाखांमधून विद्यार्थ्यास करणाऱ्या या विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका भरून दिल्या.

नुकतेच स्थापन झालेले जनता व बंडखोर कॉंग्रेस यांचे मंत्रिमंडळ संपूर्ण मुदत संपेपर्यंत राज्य कारभारकरू शकेल, असे मत या पाहणीत विद्यार्थ्यांनी दिले. नुकत्याच झालेल्या सत्तांतरात मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी इंदिरा कॉंग्रेसचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी पुढाकार घेतला असे मत ५८ टक्के विद्यार्थ्यांनी दिले.

आत्ताच्या सत्तांतरात ना. उत्तमराव पाटील मुख्यमंत्री झाले असते तर मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी पाठिंबा दिला नसता असे ५३ टक्के विद्यार्थ्यांना वाटते. या सत्तांतराचे भारतातील इतर राज्य कारभारावर काय परिणाम होतील ? या प्रश्नास ४९ टक्के विद्यार्थ्यांनी 'सर्व शक्तीचे ध्रुवीकरण होईल व इंदिरा गांधींचे वर्चस्व झुगारून दिले जाईल' असे मत व्यक्त केले.

नवे सरकार आपला बेकारीचा प्रश्न सोडवू शकेल काय ? असे विचारले असता ४८ टक्के विद्यार्थ्यांनी 'नाही' असे उत्तर दिले; परंतु ७ टक्के विद्यार्थ्यांना मात्र या सरकारच्या कार्यक्षमतेबाबत विश्वास वाटतो.

लाचलुचपत थांबविणे हे काम नवे सरकार थांबवू शकेल काय ? या प्रश्नाच्या 'हा जनतेचाच दोष आहे' या पर्यायास ४८ टक्के विद्यार्थीनी संमती दर्शविली. माजी मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांच्या 'हे मंत्रिमंडळ पाडण्यास आम्ही (इं.) कॉंग्रेसची मदत घेऊ' या विधानास ४५ टक्के विद्यार्थ्यांनी विरोध दर्शविला. ते म्हणतात, 'हा केवळ राजकीय सूड आहे.'

१४ टक्के महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जनता पक्ष हा सत्तेसाठी हपापलेला पक्ष आहे असे वाटते, तर ३८ टक्के विद्यार्थ्यांच्या मते हा इंदिरा गांधींचा राजकीय अस्त करणारा पक्ष आहे.

१९८२ सालच्या निवडणुकांच्या वेळेस जनता पक्षातील काही व्यक्तींनी फुटून नव्या पक्षाची स्थापना केली असेल, असे मत ३६ टक्के विद्यार्थ्यांनी केले, तर १७ टक्के विद्यार्थ्यांना जनता पक्ष एकसंघ झाला असेल असे वाटते.

मुख्यमंत्री शरद पवार यांचा विधीमंडळ कॉंग्रेसचा राजीनामा म्हणजे पक्षांतर्गत बंडखोरी असे ३३ टक्क्यांचे आणि 'ही नवा पक्ष स्थापण्याची सुरुवात, असे २५ टक्क्यांचे मत आहे.

ना. शरद पवार व त्यांच्या गटाने जनता पक्षात सामील व्हावे का? या प्रश्नावर ३९ टक्के विद्यार्थ्यांनी 'होय, सामील व्हावे' असे म्हटले आहे तर ९·३६ टक्के विद्यार्थी असे म्हणतात की 'आपला गट त्यांनी स्वतंत्र ठेवावा.'

विद्यार्थ्यांची मते ही अशी आहेत प्रश्न पत्रिका भरून घेताना मात्र अनेक नव्या गोष्टींचा उलगडा झाला. २० टक्के विद्यार्थी वृत्तपत्रे ही फक्त सिनेमाच्या जाहिरातीसाठीच वाचतात, त्यामुळे राजकारण म्हणजे काय याचा विचार करणे त्यांना दुरापास्त वाटते. ४० टक्के विद्यार्थी तर वृत्तपत्रातील फक्त हेड लाईन्स वाचतात त्यामुळे त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कोण हे माहीत असते, पण राजकारण म्हणजे काय याचा ते कधीच विचार करीत नाहीत. २० टक्क्यांना राजकारण वगैरे माहीत असते; परंतु फक्त २० टक्के विद्यार्थीच त्याचा विचार करतात; त्याचा अभ्यास करतात आणि त्याविषयी आपली ठाम मते बनवितात; परंतु त्यापैकी २ टक्के विद्यार्थीच आपली मते लोकांसमोर ठामपणे व निर्भयतेने मांडू शकतात.

ही पाहणी करीत असताना मेडिकलचे विद्यार्थी राजकारणात विशेष इंटरेस्टेड नसतात असे आढळून आले. फक्त २ ते ३ टक्के विद्यार्थ्यांनाच गलिच्छ राजकारणाची चीड असते, तर बहुतेक विद्यार्थी 'आपल्याला काय घेणं आहे?' या विचारांचे असतात. राजकारणासंबंधीची ही उदासीनता कशामुळे येते हा मुद्दा वेगळाच आहे. कदाचित 'Politics is the worst play of games but most intelectual gane' यामुळेही असेल, पण राजकारण हे समाज कारण व्हायला हवं, त्यातील बरबटलेपणा आणि इतर बदलही आवश्यक आहेत असे विद्यार्थ्यांचे मत आहे.

राजकीयदृष्टया विद्यार्थ्यांचे विचार काय आहेत ? राजकारण बघत असताना विद्यार्थी कसे विचार करतात ? राज्यकर्त्यांकडून त्यांच्या अपेक्षा काय असतात, इत्यादी विषयांवर मते जाणून घेण्यासाठी 'लोक जागरण समिती'तर्फेही पाहणी करण्यात आली. निरनिराळ्या राजकीय व सामाजिक दृष्टया महत्त्वाच्या प्रश्नांवर युवकांमार्फत जन-जागरणाचे कार्य करण्यासाठी 'लोक जागरण समिती'ची जून १९७८ मध्ये स्थापना झाली. प्रश्न पत्रिका लोक जागरण समितीचे अध्यक्ष श्री. अतुल कुलकर्णी यांनी पुणे विद्यापीठातील राज्य शाखेचे प्रा. राम बापट यांच्या मार्ग दर्शनाखाली तयार केली.

उज्ज्वला कोल्हटकर, जयश्री नातु, जयंत खळदकर, धनंजय रेणावीकर, नरेंद्र भोसले, उल्हास महाजन, प्रा. नांदे, नारायण डांगे या युवकांचा या पाहणी करण्यामध्ये मोठा वाटा आहे. □

# जनमतकौल पत्रिकांसोबत वाचकांकडून आलेल्या

# काही उत्स्फूर्त प्रतिक्रिया

◻ नुकत्याच झालेल्या सत्तान्तराबाबत जनमतकौल घेण्याचा आपला उपक्रम स्वागतार्ह आहे; परंतु प्रश्नावलीबाबत माझे मतभेद आहेत. उदाहरणार्थ पहिल्या प्रश्नामध्ये पवार मंत्रिमंडळ पहिले संमिश्र मंत्रिमंडळ म्हटले आहे ते चूक आहे. याआधीचे वसंतराव-नासिकराव मंत्रिमंडळही संमिश्र मंत्रिमंडळच होते. प्रश्न पाचमध्ये फक्त क्रमवारी preferences विचारायला हवी होती. म्हणजे सर्वच कार्यक्रमाचे prefrences कळले असते. प्रत्येक प्रश्नाला तिसराही एक पर्याय (तटस्थपणाचा) सुचवायला हवा होता. उदाहरणार्थ या घटनेमुळे जनता पक्षाची प्रतिमा डागाळलेली नाही किंवा उजळलेलीही नाही. होती तशीच धूसर व अविश्वासार्ह राहिली आहे; पण हे मत व्यक्त करायला तुमच्या प्रश्नामध्ये वाव नाही.

पुणे —ल. के. देशपांडे

◻ संमिश्र पवार मंत्रिमंडळ ही घटना मुळी आदर्श लोकशाहीतील तत्वे, आदर्श पायंडे, नीतिमूल्ये, जनतेचा घोर विश्वासघात करून जनता पक्षातील व टिळक-गांधी यांच्या काँग्रेसमधील गुंड, बदमाश आमदारांनी, नेत्यांनी आपल्या अलग अलग असलेल्या टोळयांचा समेट करून सत्तेचा मलिदा खाण्यासाठी वरती गोंडस नाव देऊन रचलेला एक लोकनाटयाचा फार्स होय. हे बदमाश चोर विश्वासघात करून सत्तेसाठी इतके लाचार होणार असे माहीत असते तर माझ्यासारख्या अनेक ग्रामीण युवकांनी-मतदारांनी दोन्ही निवडणुकांच्या वेळेस, लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या हाकेला ओ देऊन जी शक्ती उभी केली ती केली नसती ह्या चोरांपेक्षा अगोदरच महाचोर असलेल्या इंदिरा पक्षाला पाठिंबा देऊन शक्ती उभी केली असती आणि आंध्र-कर्नाटका प्रमाणे त्यांच्याकडे सत्ता सोपविली असती. ह्या जनता पक्षातील बदमाशांनी (केंद्रात व राज्यात असलेल्या) जनतेत ज्यांच्या देशसेवेबद्दल व त्यागाबद्दल, पूर्वी कारावास सहन कराव्या लागलेल्या देशभक्तांबद्दल आदर असलेल्या अशा लोकनायकाचा सत्तेच्या शिखरावर चढण्यासाठी शिडी सारखा उपयोग करून ती शिडी आपला उपयोग संपताच फेकून दिली आहे. ज्या जनतेने मतपेटीद्वारा आपले लोकशाहीतले हक्क परत मिळविले ती जनता ह्या बदमाशांची गाढवावरून धिंड काढल्याशिवाय कधीच राहणार नाही! या बदमाशांनी युतीचे समर्थन करताना ह्या देशातील एकाधिकारशाही आणि हुकूमशाही प्रवृत्तीचे रक्षण करण्यासाठी लोकशाही शक्ती एकत्रित आल्या आहेत,असे सांगितले. या देशातील मतदारांना हे काय मूर्ख समजतात काय? पण ज्या शांततामय मार्गाने मतपेटीद्वारा क्रांती करून आपले हक्क परत मिळविले ती जनता लोकशाहीच्या रक्षणास खंबीर असता सत्तेसाठी अशी × × × करण्याची काय आवश्यकता होती? महाराष्ट्रातील मतदारांनी लोकसभेच्या निवडणुकीमध्ये अठ्ठेचाळीस जागांपैकी जनता पक्ष व त्याच्या मित्रपक्षांस अठ्ठावीस जागा देऊन महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या अनियंत्रित संख्येस धक्का देऊन महाराष्ट्रात जनता पक्षास सेवेसाठी सत्ता देण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले होते; परंतु विधानसभेच्या निवडणूक तिकिटवाटपाच्या वेळेस घातलेला गोंधळ, अपात्र उमेदवारांना तिकिटवाटप, मित्रपक्षाचा विश्वासघात, आणीबाणीत जे अत्याचारांना जबाबदार होते अशांना जनता पक्षात प्रवेश देऊन जनता पक्षाच्या ध्येयधोरणाला काळिमा फासल्यामुळे मतदार कोणत्याच पक्षामागे ठाम उभा न राहाता, जनता पक्षास विधायक कार्यक्रमास विरोधात राहून विधायक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यास संधी देत होता; परंतु ती संधी त्यांनी गमावली आहे. पण सध्या केंद्रात असलेल्या सत्तेवरील नेते पूर्वी विरोधात असताना १९६७ च्या काँग्रेस शासनाने आघाडीचे जे तंत्र, एखाद्या गटास फोडावयाचे, त्यास मुख्यमंत्रिपद देऊन आघाडी स्थापन करायची व सत्ता मिळवायची, तेच टीका करणाऱ्या नेत्यांनी, सज्जनतेचा आव आणणारांनी त्या टाइपचे राजकारण खेळून लोकशाहीच्या नावाला काळिमा फासलेला आहे. केंद्रीय नेत्यात सुद्धा कारभारात कधीच एकवाक्यता न ठेवता आपसात भांडणे करून गोरगरिबांच्या, हरिजनांच्या उद्धार विषयक कार्यक्रमांना फाटा देऊन घोर विश्वासघात केलेला आहे.

नानगाव (ता. दौंड) —रमेश गुंड

◻ सध्याच्या परिस्थितीमध्ये श्रीमती इंदिरा गांधी या देशामध्ये गडबड माजवून आणीबाणी ही समर्थनीय होती अशी लोकांची समजूत करून देण्याच्या मागे लागलेल्या आहेत, म्हणून त्यांना लढा देण्यासाठी सर्व लोकशाही विचारसरणीच्या लोकांनी एकत्र येऊन नवीन सरकार स्थापन करण्यात काहीही गैर नाही. महाराष्ट्रात सरकारकडून सामान्य माणसांची व्यावसायिक कर रद्द करण्याची अपेक्षा आहे किंवा त्यात फेरबदल करून समानता आणण्याचा प्रयत्न करावा. सर्व वकिलांना रु. २५० कर भरावा लागतो. त्यातील काहींची मासिक मिळकत रु. ३००० असते तर काहींची रु. ६०० फक्त. आपल्या देशाची आर्थिक स्थिती ही शेतीव्यवसायावर अवलंबून असल्यामुळे त्यास प्राधान्य देण्यात यावे. तसेच राजस्थान सरकारप्रमाणे महाराष्ट्रातही अन्त्योदयाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

नागपूर —विद्याधर चौधरी

◻ राष्ट्रपति-राजवट नको म्हणून ही घटना योग्य वाटते. शिवाय श्री. शरद पवार व जनता पक्ष शासनाला काही विधायक वळण लावू शकतील असा विश्वास वाटतो. म्हणूनच ही घटना लोकशाहीला उपकारक आहे. स्थानिक परिस्थितीमुळे इंदिरा गांधी एखाद्या ठिकाणी वरचढ होतील; पण त्याचा बाऊ करू नये. जनता पक्ष अजून निश्चित बांधीव स्वरूपात नसल्यामुळे असे होणे अपरिहार्य आहे. प्रतिमा उजळली किंवा डागळली असे काही नाही. कुटुंबनियोजनातील सक्तीला विरोध.

पुणे भालचंद्र कानिटकर

◻ संमिश्र पवार मंत्रिमंडळ येणे ही घटनाच मुळी लोभवादी, मतलबशाही आहे. कारण श्री. पवार ह्यांनी आपल्या पक्षाच्या अंतर्गत राजकारणासाठी, सत्ताबाजीसाठी जनताबरोबर वाटाघाटी करून पक्षांतराने सत्ता मिळविली. तसेच जनताने फक्त सत्तेच्या हव्यासापोटी ही युती केली. अशा प्रकारे हे राजकारण लोकशाहीस योग्य वाटत नाही. तसेच प्रथम दोन्ही काँग्रेसनी घाणेरडे राजकारण करून अभद्र युतिद्वारे सत्ता काबीज केली. तेव्हा तसा नैतिक अधिकार जनताप्रणीत आघाडीस योग्य असाच होता. खरे म्हणजे त्या वेळेस जनता सरकार अधिकारारूढ होऊन ह्याच श्री. यशवंतराव चव्हाणप्रणित काँग्रेसने पाठिंबा देऊन जर सरकार अस्तित्वात आले असते तर खरी लोकशाहीची बूज राखली गेली असती; परंतु आमच्या भारतात हे होणे शक्य नाही. काय हरकत होती जनता पक्षास संधी देऊन राज्यकारभार करण्यास? ह्या श्री. पवार काँग्रेसने त्या वेळी 'जनता'स सहकार्य करण्यास हरकत नव्हती; परंतु असे होणे नाही. ह्या लोकशाहीची बूज फक्त पाश्चिमात्य देशांतच राखली जावी काय? असा प्रश्न आम्हाला नेहमी भेडसावीत असतो! तसा प्रश्न मी आमच्या जनतानेत्यांना व आमच्या देशातील राजकारण्यांना विचारतो; परंतु सत्तेच्या हावेपायी कोणीही उत्तर देऊ शकणार नाही.

इंदिरा काँग्रेस मजबूत होण्याचा प्रश्न उद्‌भवतच नाही. कारण जनमानसात आज तरी तिला स्थान नाही. निदान नैतिकदृष्ट्या. कारण गेल्या आणीबाणीतील अत्याचार अजूनही लोकांच्या स्मरणातून पुसले गेलेले नाहीत. तसेच, ह्या आणीबाणीतील सहकाऱ्यांबरोबर आज 'जनता'ने सहकार्य करून सत्ता मिळविली ही जनताची निव्वळ प्रतिमा डागळण्याची क्रिया होय.

मुंबई सुभाष जाधव

◻ पवार अथवा त्यांचा कार्यक्रम याबद्दल नापसंती नाही; पण ज्या पद्धतीने हे मंत्रिमंडळ आले त्या पद्धतीबद्दल व त्या पद्धतीच्या घातुक विचारसरणीबद्दल नापसंती आहे. कोणी म्हणतात यामागे खासदार यशवंतराव आहेत, कोणी म्हणते नामदार वसंतदादा पाटील इंदिरा काँग्रेसकडे झुकत होते, ते समजूनही समजत नव्हते. घसरत चालले होते. कोणी म्हणते, इंदिरा काँग्रेसकडे सत्ता असणे म्हणजे हुकूमशाही वाढविण्यास सहकार्य करणे. म्हणून ती संपुष्टात आणली. तर कोणी म्हणते, समाजवादी विचारसरणीची खरी मंडळी एका बाजूला व हुकूमशाही प्रवृत्ती एका बाजूला, गोरगरिबांचे कल्याण आम्हीच करू शकू. अशी वल्गना दोन्ही बाजूंनी आहे; पण माझ्या अल्प अनुभवानुसार या झालेल्या सत्तान्तरामागचे कारण दिसते आहे ते हे की, महाराष्ट्राची जडण-घडण प्रत्यक्षामध्ये अशी आहे की, ब्राह्मणांनी पांडित्य, चातुर्य व शैक्षणिक मिरासदार समजावे व मराठ्यांनी कुठल्याही मार्गाने कसल्याही अवस्थेत सत्ताधारी बनावे. त्यांच्याशिवाय इतरांनी सत्तेवर येणे, समाजवाद अमलात आणणे, तळा-गाळातल्यांबद्दल विचार करणे म्हणजे मराठ्यांचा तीळपापड होण्यासारखीच अवस्था आहे. कर्मधर्मसंयोगाने उपमुख्यमंत्रिपद व गृहमंत्रिपद एका मागासवर्गीय व्यक्तीच्या (तिरपुडे) पण खऱ्याखुऱ्या प्रशासनकुशल, खमक्या व्यक्तीच्या वाट्याला येणे व त्यानं स्वभावगुणधर्मे महत्त्वपूर्ण समाजोद्धाराचे निर्णय घेणे व ते राबविणे योग्य होते. उदा. पोलिसअधिकाऱ्यांच्या भरत्यांचा बाजारभाव रु. २५०००/– झाला होता. ते भरतीचे काम पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे सोपविणे. मागासवर्गीयांवर आतापर्यंत खुळ्या सवर्णीकडून अत्याचार होतात यासाठी चौकशीअधिकारी मागासवर्गीयांमधून निवडणे, पोलिस डिपार्टमेंट सहसा हालत नाही म्हणून सर्व पोलिसखात्यातील बदल्या करणे आदी महत्त्वपूर्ण निर्णय, सत्तेला हपापलेल्या अनंत काळापासून सत्ता भोगलेल्या मराठ्यांना हे उघड्या डोळ्यांनी जिवंतपणी कसे बघवेल? म्हणून खासदार यशवंतराव व त्यांचे मानसपुत्र यांनी एकविचार करून त्यांच्या दृष्टीने महाराष्ट्रावर आलेले हे संकट दूर केले व ते आता त्यांच्या परीने शेवटच्या घटकाचा उद्धार करण्यास सिद्ध झालेले आहेत. म्हणून पवार मंत्रिमंडळ येणे ही घटना अयोग्य. लोकशाहीचा जप केला नाही, समाजवादाचा मंत्रोच्चार केला नाही व गोरगरिबांच्या कल्याणाच्या ओव्या आळवल्या नाहीत तर निवडणूक जिंकता येत नाही, म्हणजे सत्ता मिळत नाही, म्हणजे स्वतःच्या हाताने स्वतःचे पितरास कावळा 'शिवत' नाही ही अवस्था होते. म्हणून हा सारा बेबनाव मुखावाटे तरी करीत राहाणे अत्यावश्यक. कोण म्हणते ही लोकशाही आहे? ही लोकशाही तोंडातली आहे व सत्ताशाही ही कृतीमधली आहे. तुम्हीच बघा जनता–पार्टीचा निवडणूक जाहीरनामा आणि काय ते ठरवा. केन्द्राच्या कृतीमुळे जनता पक्ष राज्य संभाळू शकत नाही, सर्वसामान्य माणसासाठी उद्धारक कार्यक्रम बनवू शकत नाही, अंमलात आणू शकत नाही. तो फक्त इंदिरा गांधिद्वेषाने पेटलेला आहे आणि द्वेषाने पेटलेली राजवट द्वेषाशिवाय काहीच करू शकत नाही. म्हणून त्यांचे आपापसातले हे द्वेषभाव चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. दाबूनही दबत नाहीत. उद्या हीच द्वेषाने पेटलेली माणसे समाजाचा, जनतेचा द्वेष करतील आणि त्यातच जळतजळत संपून जातील. अशा अवस्थेत आज त्यांना आणीबाणीतले संकटराव ते आज शंकरराव म्हणून पवित्र झाले. आणीबाणीतील शरदराव हे आज युतीमुळे पाक झाले. म्हणजे हे जनता व हे काँग्रेस ह्या काही फरक नसून, तात्त्विक बैठक नसून सारे काही ब्राह्मण–मराठ्यांच्या हाती सत्ता टिकविण्याचे प्रकार आहेत. तत्त्वाला स्थान नाही. तत्त्व संभाळण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्रीय विद्यार्थी परिषद असल्या संघटना पाठीशी आहेतच.

मुंबई एन्. डी. सोनवणे

[ जागेअभावी सर्व 'प्रतिक्रिया' या अंकी देता आल्या नाहीत. आणखी काही प्रतिक्रिया पुढील अंकी. ]

जनमतकौल पत्रिकांचे विवरण : पृष्ठ ४ वरून

त्याही सरकारकडून जनतेच्या अपेक्षा मुख्यतः गरजा पूर्ण करणे, नोकरी देणे, पिण्यासाठी पाणी देणे अशाच दिसतात. सामाजिक किंवा तात्त्विक पातळीवर सरकारने काही करावे असे त्यांना वाटत नाही. प्यायला पाणी मिळाले पाहिजे हे खरे, भेदभाव राहिला तरी चालेल. नोकरी आधी मिळाली पाहिजे, कुटुंब नियोजन तिसऱ्या क्रमांकावर राहू द्या, असे त्यांचे म्हणणे आहे. सामाजिक समतेविषयी चळवळ करावी किंवा चालू असलेल्या चळवळीस सरकारने सहाय्य करावे या बाबतीत पूर्णपणे उदासीनता आहे. हे मत एक गाव एक पाणवठा ही चळवळ सध्या ज्या प्रकारे चालविली जाते, त्याविषयीचेही असण्याची शक्यता आहे. कारण पाचव्या क्रमांकाची मते या चळवळीला देणाऱ्यांत विद्यार्थी, नोकरदार, संकीर्ण हे सर्वच आहेत. एकीकडे एक गाव एक पाणवठा ही चळवळ मुख्यतः सुशिक्षितांच्या नेतृत्वाने चाललेली दिसते, तर दुसरीकडे त्यांच्यापैकी फार मोठा वर्ग त्या चळवळीविषयी उदासीन आहे, याचा अर्थ पाणवठ्याच्या प्रवर्तकांनी समजून घ्यावा.

सक्तीचे कुटुंब नियोजन हा आणीबाणीच्या काळात बदनाम झालेला कार्यक्रम! महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही त्याला मतदारांनी तिसरा क्रमांक दिला आहे. अपेक्षेप्रमाणे पहिला क्रमांक देणाऱ्यात डॉक्टर व इंजिनिअर आहेत. दुसरा क्रमांक वकिलांनी दिला आहे. शेतकऱ्यांनी पाचवा व मजुरांनी सहावा क्रमांक दिला आहे. तरीही एकूणात तिसऱ्या क्रमांकाची मते 'सक्तीच्या' कुटुंब नियोजनाला मिळावीत, हे एक शुभचिन्ह आहे. आणीबाणीतील अत्याचारांमुळे या कार्यक्रमाभोवती निर्माण झालेले भीतीचे वलय आता हळूहळू विरत चालले आहे आणि हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे, ही जाणीव जनतेमध्ये कायम आहे. केंद्र सरकारने गेल्या वर्ष–सव्वा वर्षात कुटुंबनियोजनाकडे पद्धतशीर दुर्लक्ष केले, अशी हाकाटी होत असताना जनतेने कुटुंब नियोजनास अनुकूलता दर्शविली आहे, यापासून बोध घेऊन पुन्हा एकदा नव्या जोमाने हा कार्यक्रम सुरू करण्यास हरकत नाही.

किमान वेतन रु. ५, याही कार्यक्रमाला कोणीही प्रथम प्राधान्य दिलेले नाही. बहुसंख्य ठिकाणी किमान वेतन कायदा लागू झाल्याचा हा परिणाम असेल किंवा ग्रामीण व शेतमजूर या पाहणीमधून सुटल्यामुळे असे झाले असेल. अपेक्षेप्रमाणे मजुरांनी याला दुसरा क्रमांक दिला आहे. शेतकरीवर्गाने तिसरा द्यावा हेही बरोबरच

## कार्यक्रम व प्राधान्य

| कार्यक्रम | —प्राधान्य क्रमांक— | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. सक्तीचे कुटुंब नियोजन | डॉक्टर, इंजिनिअर | वकील | महिला, विद्यार्थी, संकीर्ण | नोकरदार, स्वतंत्र व्यावसायिक | शेतकरी | मजूर |
| २. किमान वेतन रु. ५ | — | इंजिनिअर, मजूर | नोकरदार, शेतकरी, वकील, स्वतंत्र व्यावसायिक | विद्यार्थी, संकीर्ण | महिला | डॉक्टर |
| ३. सुशिक्षितांस रोजगार हमी | महिला, विद्यार्थी, वकील, संकीर्ण | नोकरदार, शेतकरी, स्वतंत्र व्यावसायिक | — | मजूर, डॉक्टर | इंजिनिअर | — |
| ४. शेती उत्पन्नावर कर | — | — | इंजिनिअर | वकील | मजूर, डॉक्टर, स्वतंत्र व्यावसायिक | नोकरदार, महिला, विद्यार्थी, शेतकरी, संकीर्ण |
| ५. प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय | नोकरदार, शेतकरी, मजूर, स्वतंत्र व्यावसायिक | महिला, विद्यार्थी, डॉक्टर, संकीर्ण | — | इंजिनिअर | — | वकील |
| ६. एक गाव एक पाणवठा | — | — | मजूर डॉक्टर | महिला शेतकरी | नोकरदार विद्यार्थी, वकील, संकीर्ण | इंजिनिअर, स्वतंत्र व्यावसायिक |

आहे. विद्यार्थी आणि महिला यांचा या प्रश्नाशी फार दुरून संबंध असल्यामुळे त्यांनी अनुक्रमे चौथा आणि पाचवा क्रमांक दिलेला दिसतो. नोकरदार आणि स्वतंत्र व्यावसायिक यांनी मध्यम मार्ग पत्करून या कार्यक्रमास तिसरे स्थान दिले आहे. याविषयी अधिक उकल करण्याची जबाबदारी समाजशास्त्रज्ञ व अर्थतज्ज्ञ यांची आहे.

शेतीउत्पन्नावर कर बसविला पाहिजे, अशी जनतेची मागणी असल्याचे बोलले जाते; परंतु या पाहणीत तसे कोणाचेही म्हणणे नाही. वकील व इंजिनिअर यांच्या नगण्य गटांनी तिसरा क्रमांक दिला आहे तर शेतकरी, विद्यार्थी, स्वतंत्र व्यावसायिक, नोकरदार आणि संकीर्ण यांनी सहावे स्थान दिले आहे. महिलांनीही सहावे स्थान द्यावे याची कारणे त्याच जाणोत !

शेतीउत्पन्नावर कर बसवू नये, असे बहुसंख्यांना वाटण्याचे एक कारण असे दिसते की, मागे म्हटल्याप्रमाणे या पहाणीत बहुसंख्येने असलेले नोकरदार केवळ शहरातले नाहीत- ह्यांच्यापैकी सर्वांचाच या ना त्या प्रकारे शेतीशी संबंध असावा किंवा येत असावा. ग्रामीण भागातून शेती सांभाळून खंडाने लावून स्वत: नोकरी करणे किंवा कुटुंबातील एका भावाने शेतीकडे लक्ष पुरवून दुसऱ्याने नोकरी करणे, नोकरीकडे शेतीचा जोडधंदा म्हणून पाहणे अशी विचारसरणी अधिकाधिक लोकप्रिय होताना दिसते. तिचेच हे प्रतिबिंब असणे शक्य आहे.

एकंदर पाहाता जनता पक्षाला, शहरातील असो की खेड्यातील असो, सुशिक्षित नोकरदारवर्गाचा पाठिंबा नक्कीच आहे. याचा अर्थ हा पक्ष केवळ शहरी मध्यमवर्गीयांचाच आहे, हे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. ग्रामीण भागातील वृत्तपत्रे वाचणारे थोडे-फार राजकीय चर्चा करू शकणारे या पक्षाच्या बाजूनेच आहेत. मात्र या पक्षाने सत्तेसाठी वाटेल त्या तडजोडी करू नयेत असेच त्यांच्यापैकी बऱ्याच जणांना वाटते. कुटुंब नियोजनामागील 'सक्तीचे' हा शब्द नसता तर त्याही कार्यक्रमाला अधिक प्राधान्य मिळाले असते. इंदिरा काँग्रेसचा फारसा बाऊ सर्वसामान्य जनतेच्या मनात नाही. यातून नैराश्यवाद्यांनी खूपच शिकण्यासारखे आहे. इंदिरा गांधी किंवा तत्सम कुणी तरी सत्तेवर येण्यापेक्षा माजी काँग्रेसजन आणि जनता पक्ष यांच्या वरकरणी खिळखिळ्या, तकलादू वाटणाऱ्या राजवटीलाच मतदारांनी पाठिंबा द्यावा, ही भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने 'उपकारक' घटना आहे. मतदार थोडेसे अधिक प्रगल्भ झाल्याचे ते लक्षण आहे, असे म्हणता येईल.

या पाहणीमधून व्यक्त होणारी एक प्रवृत्ती मात्र चिंताजनक आहे. एकछत्री हुकूमशाही राजवटीच्या भ्रामक आकर्षणातून बाहेर पडणारे मतदार सामाजिक आणि तात्त्विक (Ideological) पातळीवर मात्र फारसे पुरोगामी होताना दिसत नाहीत, याचे मर्म–भारतीयांच्या सामाजिक असमानतेवर आधारलेल्या समाजरचनेत असेल, की कोणतीही राज्यपद्धती तिच्यामधील तात्त्विक आशयाच्या संदर्भात न राबविता तिचे कर्मकांड हस्तगत करून समाजरचना मात्र पूर्वीप्रमाणेच राखण्याच्या कौशल्यात असेल ? लोकशाहीचा स्वीकार आम्ही हुकूमशाहीचा तडाखा खाऊन शहाणे झाल्यामुळे करतो आहोत. न्याय, समता यावर मुख्यत: आधारलेला समृद्ध समाज निर्माण करण्यासाठी लोकशाहीच योग्य आहे, या भूमिकेतून आम्ही लोकशाहीचा स्वीकार करीत नसू तर प्रबोधनाला अजून पुष्कळच वाव आहे असे म्हणावे लागेल. □

[जनमतकौल पत्रिका तयार करणे व त्या भरून आल्यावर त्यांची छाननी व विश्लेषण करणे या कामी पुणे विद्यापीठाच्या राज्यशासनविभागाचे प्रा. लिमये व प्रा. व्होरा यांचे बहुमोल साहाय्य झाले.]

# जनमतकौल : विचारले गेलेले पाच प्रश्न

१. महाराष्ट्रात हे पहिले संमिश्र पवार मंत्रिमंडळ येणे ही घटना मला..........................योग्य वाटते / अयोग्य वाटते.
२. नव्या मंत्रिमंडळाचा बनाव लोकशाहीला........................उपकारक आहे / मारक आहे.
३. या ( मंत्रिमंडळाच्या ) घटनेमुळे इंदिरा काँग्रेस अधिक बळकट होईल असे आपल्याला वाटते काय ?..............होय / नाही.
४. या ( मंत्रिमंडळाच्या ) घटनेमुळे जनता पक्षाची प्रतिमा.........डागळली आहे / उजळली आहे.
५. नव्या मंत्रिमंडळाने पुढील सहा कार्यक्रमांपैकी कोणत्या तीन कार्यक्रमांना प्राधान्य द्यावे असे आपल्याला वाटते ?

| | |
|---|---|
| १ : सक्तीचे कुटुंबनियोजन | २ : किमान वेतन–रुपये पाच |
| ३ : सुशिक्षितांसाठी रोजगार हमी | ४ : शेतीउत्पन्नावर कर |
| ५ : प्रत्येक खेड्यात पिण्याच्या पाण्याची सोय | ६ : प्रत्येक गावात 'एक गाव एक पाणवठा' |

# राजकीय पक्षांची अवस्था दयनीय आहे....

प्रा. व्ही. एम्. सिरसीकर

'मार्च १९७८ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत निर्विवाद बहुमत कोणत्याच राजकीय पक्षाला मिळाले नव्हते. त्यामुळे कॉंग्रेस, इंदिरा कॉंग्रेस आणि जनता पक्ष हे तिन्हीही प्रमुख पक्ष सत्ता मिळविण्याच्या खटपटीत होते. त्यात वसंतदादा पाटील यशस्वी होऊन कॉंग्रेस आणि इंदिरा कॉंग्रेस यांच्या आघाडीचं सरकार अधिकारावर आलं. अर्थात राजकीय तत्त्वापेक्षा सत्तेची लालसा हीच मूळ किंवा महत्त्वाची प्रेरणा या घटनेमागे होती.

'लोकशाही समाजात प्रत्येक व्यक्तीला सत्तास्थान मिळविण्याचा अधिकार असतो. सत्तेशिवाय समाजहित साधणेही अवघड असतं. त्यामुळे सत्ता मिळविण्याचा प्रयत्न हा स्वाभाविक (normal) मानला पाहिजे. शरद पवारांनी उचललेल्या पावलांमुळे पारंपारिक पक्षपद्धतीला धक्का बसला आहे; परंतु जर मर्यादितपणे, महाराष्ट्रापुरताच विचार करायचा झाला तर ही घटना एका नव्या सामाजिक बदलाचीही सूचक ठरू शकेल. याची कारणे दोन–एक तर या घटनेमुळे महाराष्ट्रामध्ये आजवर असलेली आणि टिकून राहिलेली कॉंग्रेसची सत्तेची मक्तेदारी नष्ट झाली आहे आणि दुसरं कारण म्हणजे, नव्या संयुक्त आघाडीमुळे पूर्वी सत्तेला वंचित असलेले समाजातील घटक आता सत्ता मिळवू शकले आहेत.

'पक्षनिष्ठेच्या दृष्टिकोनातून विचार केला तर एकंदर भारतीय पातळीवरील राजकारणातली पक्षनिष्ठा आता ठिसूळ झाली आहे. त्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्षांची अवस्था दयनीय आहे. कारण पक्षनिष्ठा आणि सत्तेद्वारा समाजहित साध्य करणे या दोन विचारांच्या संघर्षात कोणत्याही एका बाजूची निवड करणे फार कठीण असते. शिवाय जनता पक्ष आणि त्याचे इतर मित्रपक्ष व पाठीराखे यांनाही सत्तेची लालसा होतीच, ही गोष्टही या संदर्भात लक्षात घेतली पाहिजे.

'या नव्या बनावामुळे राजकारणाला आणि समाजहिताला नवी पुरोगामी दिशा मिळेल ही अपेक्षा सफल होणं किंवा न होणं अनेक घटकांवर अवलंबून आहे. मंत्रिमंडळाचा एकसंधपणा (Cohesiveness) शरद पवारांचं नेतृत्व, प्रशासकीय वर्गाचं त्यांना मनःपूर्वक सहकार्य आणि सामान्य जनतेचा सतत पाठिंबा हे त्यापैकी काही मुख्य घटक आहेत. हे सर्व जर घडलं तरच या नव्या मंत्रिमंडळाला काही प्रागतिक पावलं टाकणं शक्य होईल. मग शरद पवार आणि त्यांचे पाठिराखे एकाधिकारशाहीच्या किती विरुद्ध आहेत, हा भाग या ठिकाणी अप्रस्तुत आहे. आणखीही एक मुद्दा या संदर्भात आपण लक्षात घेतला पाहिजे तो असा की, महाराष्ट्रातील राजकारण भारतीय राजकारणाशी निगडीत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील या घटनेचा केंद्रीय राजकारणावर, पक्षोपक्षांवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. त्याचप्रमाणे जर केंद्रस्थानी काही नवीन प्रवाह निर्माण झाले, तर महाराष्ट्रातील राजकारणही त्यापासून अलग ठेवता येणार नाही.'

**प्रश्न :** नव्या मंत्रिमंडळाकडून सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने काही महत्त्वाची पावलं उचलली जातील, असं आपल्याला वाटतं का?

**उत्तर** – राज्य सरकारांना पडणाऱ्या अधिकाराच्या मर्यादा आणि आर्थिक साधनांची कमतरता लक्षात घेता सरकारकडून फार मोठ्या अपेक्षा करणंच अयोग्य ठरेल. त्यातच अलीकडे उचललेली फी-वाढ रद्द करणे, राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना केंद्राच्या दराने महागाईभत्ता देणे यासारखी पावलं भविष्यकाळाच्या दृष्टीने धोक्याची ठरण्याची शक्यता आहे. हा आर्थिक बोजा सामान्यतः शहरी मध्यमवर्गीयांसाठीच घेतलेला आहे. अशा तऱ्हेचा आर्थिक बोजा सत्तेवर आल्याआल्याच अंगावर घेतल्यानंतर हे सरकार सामान्य जनतेसाठी आर्थिक कोणते कल्याणकारी कार्यक्रम राबवू शकेल, याविषयी मी साशंकच आहे. 'शुगर लॉबी'चं प्राबल्य आता कमी झालं आहे, हादेखील आभासच ठरेल; तेव्हा हे सरकार पूर्वीच्या कॉंग्रेस सरकारपेक्षा अधिक प्रागतिक आहे किंवा गरिबांचे कैवारी आहे असं समजणं भाबडेपणाचं ठरेल.

**प्रश्न :** या नव्या युतीमुळे जनता पक्षावर सामान्य नागरिक थोडासा नाराज झाला आहे असं दिसतं. कारण, 'ज्या माणसाने आणीबाणीच्या काळात या राज्याचा गृहमंत्री होऊन इथले तुरुंग भरले त्यांच्याच हातात हात मिसळून हे 'जनता'वाले जातात तरी कसे?' अशी प्रतिक्रिया ऐकायला मिळाली. यावर आपले काय मत आहे?

**उत्तर** – भारतीय राजकारणाचे विश्लेषण विचारसरणीच्या निकषावर करण्याचा प्रयत्न अनेकदा चुकीचा ठरतो; पण हे विश्लेषण सत्ता हा केंद्रबिंदू मानून केल्यास पुष्कळ प्रमाणात यशस्वी ठरतं. थोडक्यात सांगायचं तर, केवळ 'नृपनीति वारांगना इव,' असं नसून लोकशाहीतील राजकीय पक्ष हा सत्तेसाठी कोणताही घरोबा करायला मागे-पुढे पाहात नाही हेच खरं.

**प्रश्न** – कॉंग्रेस आणि इंदिरा कॉंग्रेस यांची आघाडी, दोन्ही पक्षांचे विचाराच्या बाबतीत बऱ्यापैकी साम्य असूनही चार-साडेचार महिन्यांत मोडन निघाली. या पार्श्वभूमीवर निरनिराळ्या पक्षांचे मिळून बनलेल्या या संमिश्र सरकारबद्दल काय म्हणता येईल?

**उत्तर** – मंत्रिमंडळातील सौहार्द कितपत टिकेल याविषयी निश्चित भविष्य करणे कठीण आहे; पण या नव्या मंत्रिमंडळातील सर्वच पक्ष सत्तेसाठी एकत्र आलेले असल्यामुळे आघाडीचे विघटन होऊ नये, यासाठी सर्वच जण प्रयत्नशील राहतील असा विश्वास वाटतो. सुरुवातीला जाहीर केलेली मंत्र्यांची संख्या वाढत गेली याचं मुख्य कारणही आघाडीतील सर्व घटकांना सत्तेत भागीदारी देणं भाग पडलं, हेच आहे आणि त्या दृष्टीने विचार करता आता कोणताही घटक सत्तेपासून वंचित राहिलेला दिसत

नसल्यामुळे या नव्या मंत्रिमंडळाची स्थिरता अधिक शक्य वाटते.

'या घटनेमुळे सर्वांत व्यथित झालेले लोक म्हणजे इंदिरा काँग्रेसचे नेते. कारण केवळ सत्ताच गेली असं नव्हे तर महाराष्ट्रातील राजकारणात त्यांना अचानक दुय्यम किंवा तिय्यम स्थान मिळालं. यामुळं त्या पक्षातील नेत्यांनी व्यक्तिशः किंवा पक्षदृष्टचाही या सरकारवर हल्ले करणं स्वाभाविक ठरते; पण भारतीय राजकारणाचा अनुभव असलेल्या कोणालाही एक गोष्ट निश्चित माहीत असते की, या ठिकाणी राजकीय सत्तेचे पाठबळ नसताना समाजाला आपल्या कावृत ठेवणे कोणालाही शक्य होत नाही. त्यामुळे हे नवे मंत्रिमंडळ दीर्घकाळ टिकल्यास इंदिरा काँग्रेसला गळती लागून त्यांचे महाराष्ट्रातील अस्तित्वही धोक्यात येईल.'

'प्रश्न : ही सगळी पक्षीय सुंदोपसुंदी, सत्तेची लालसा आणि त्यामध्ये होणाऱ्या लोकशाहीच्या अस्सल तत्त्वाचा ऱ्हास या बाबींचा विचार करता, त्यापेक्षा एकाधिकारशाही किंवा हुकूमशाही बरी, असा विचार हल्ली काही ठिकाणी पुन्हा डोकं वर काढताना दिसतो.

उत्तर : संसदीय लोकशाहीचा गेल्या तीन दशकांचा आणि पक्षपद्धतीचा बरा-वाईट अनुभव जमेस धरूनदेखील एकाधिकारशाही वा तत्सम कोणतीही शासनपद्धती समाजाला उपकारक ठरेल, असं मानणं केवळ चुकीचंच नव्हे तर घातकही ठरेल. कारण एकाधिकारशाहीचा तात्पुरता अनुभवदेखील किती भयानक होता याचा विसर या संदर्भात या लोकशाहीच्या टीकाकारांना पडता कामा नये. ◻

# कोणताही गुणात्मक फरक मला दिसत नाही....

प्रा. राम बापट

महाराष्ट्रामध्ये हे जे नवीन मंत्रिमंडळ आले आहे त्याच्या घडणीचा नैतिकदृष्ट्या विचार करूनही मला आश्चर्य वाटत नाही. कारण गेल्या काही वर्षांतले भारतातील राजकारण हे लोकशाही मूल्यांना छेद देणारंच आहे आणि सर्व राजकीय पक्ष व संघटना त्याला जबाबदार आहेत. अर्थात माझ्या या बोलण्याचा अर्थ कोणीही असा समजू नये की, लोकशाही राज्यपद्धती मला मान्य नाही किंवा मी लोकशाहीचा टीकाकार आहे. लोकशाही मूल्यांतूनच भारत सबळ होईल, नवा समाज उभारण्याच्या जबाबदारीचं प्रबोधन करीत अन्याय दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे, असं माझं निश्चित मत आहे; पण समाजाचे प्रश्न सोडविण्याच्या मिषाने जी राजकीय सौदेबाजी चालली आहे ती चिंताजनक आहे. हे सर्व राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते समाजाच्या वेगवेगळ्या तात्कालिक मागण्यांवर तात्पुरती फुंकर मारीत राहिले आहेत आणि वरवरच्या (superficial) लोकजागृतीमुळे लोकही मागण्या करतात; पण त्यांच्यामध्ये आपण संघटित व्हायला पाहिजे, ही जाणीव असूनही तो संघटितपणा मात्र दिसत नाही. त्यामुळे हात आणि तोंडं मात्र वाढतायत पण खिरापत फक्त कमी पडतेय अशी आजची राजकीय आणि सामाजिक स्थिती आहे.

'अनेक पक्षांची मोट एकत्र बांधलेले हे सरकार किती काळ तग धरू शकेल, हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. हे आहे असे सुद्धा वर्षानुवर्षं चालत राहील. कारण लोकशाही-मूल्यं आता फाटत चालली आहेत आणि या नव्या मंत्रिमंडळांचा बनाव हे याच गोष्टीचे द्योतक आहे. लोकनीती आणि राजनीती आता वेगळी राहिलेली नाही हेच यातून सिद्ध होते. जनता पक्षापुरताच विचार करायचा झाला तर काही तरी भव्य-दिव्य स्वप्न साकार करणारा पक्ष, अशी त्या पक्षाबद्दलची प्रतिमा माझ्या मनात कधीच नव्हती. १९६९ च्या आधीचा काँग्रेस पक्ष व आताचा हा जनता पक्ष यांच्यामध्ये मला कोणताच गुणात्मक फरक दिसत नाही. या पक्षाचा विचार करताना आज नैतिक कसोटचा वापराव्याशाच वाटत नाहीत. मला त्या नको आहेत असे नाही; पण आज त्या ज्या तऱ्हेने वरवर वापरल्या जातात तशा नको आहेत. भाबडेपणावर माझा विश्वास नाही. कोणत्याही नेत्याच्या व्यक्तिगत चारित्र्यापेक्षा त्याने किंवा त्याच्या पक्षाने आखलेले धोरण किंवा कार्यक्रम लोकविकासाच्या दृष्टीने पोषक आहेत की नाही, हा माझ्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

'या कार्यक्रमाच्या बाबतीतही विचार करताना एक गंमत दिसते. कार्यक्रमाविषयी सर्वच राज्यकर्त्यांची एक प्रकारची घातक एकवाक्यता दिसते. सत्तेवर आलेला कोणताही राजकीय पक्ष हा कार्यक्रम अचूकपणे पकडतो; पण त्या कार्यक्रमाची अंमलबजावणी कोणीच यशस्वीपणे करू शकत नाही. याचं मुख्य कारण मला दिसतं ते असं की, अशा तऱ्हेने आखलेला कार्यक्रम प्रत्यक्ष राबविताना जी राजकीय किंमत द्यावी लागेल ती देण्याची पात्रता, मानसिक तयारी आणि हिंमत आज अस्तित्वात असलेल्या कोणत्याही राजकीय पक्षात आढळत नाही. दिवसेंदिवस राजकारणाला सवंग घोषणांचे आणि बाजारूपणाचं स्वरूप येत चाललेले आहे. प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळीवर असं दिसतं की, वाढती महागाई, बेकारी, असुरक्षितता यांची दखलसुद्धा सौदेबाजीच्या पातळीवर आज घेतली जाते. विधिमंडळात चालणारी सुंदोपसुंदी, कोणतेही विधिनिषेध न बाळगता चालणारी पक्षांतरे यामुळे पेचप्रसंग गडदच होत चालले आहेत.

'हे नवे मंत्रिमंडळ किती काळ टिकेल यामध्ये मला रस नाही. तो प्रश्न माझ्या दृष्टीने महत्त्वाचा नाही. तर आता इथून पुढे निरनिराळे राजकीय पक्ष कोणते आणि कसे डावपेच लढवितात हे पाहण्यात मला अधिक रस आहे. गेल्या तीस वर्षांत जे काही घडले त्यापेक्षा हे नवे सरकार काही निराळे घडवून दाखवील अशीही माझी अपेक्षा नाही. कारण पूर्वीच्या मंत्रिमंडळापेक्षा या नव्या मंत्रिमंडळामध्ये आणि त्याच्या कार्यक्रमामध्ये कोणताही गुणात्मक फरक मला दिसत नाही. फक्त घोषणा बदलल्या आहेत, पण राजकारणाचे स्वरूप आहे तसेच, सवंगच आहे. अर्थात तेच चेहरे राजकारण करीत असल्यावर हे सारे बदलणार तरी कसे? आम्ही अशा

काही अपेक्षा बाळगणेच भाबडेपणाचे ठरेल. या सरकारने सर्वसामान्य शांतता आणि स्थैर्य टिकविले तरी खूप, अशी आजची परिस्थिती आहे. एवढे कशाला, कदाचित असाही काळ येईल की, शासन आहे, ही सुद्धा भाग्याचीच गोष्ट मानावी लागेल. या सरकारला जर खरोखरच लोकहिताची काही कामे करायची असतील तर काही आजपर्यंत जपल्या गेलेल्या हितसंबंधांना धक्का दिल्याशिवाय, ते मोडून काढल्याशिवाय हे शक्यच होणार नाही. रोजगारहमी योजना किंवा तशा इतर कोणत्याही योजना धनिकांना हात लावल्याशिवाय यशस्वी होऊ शकणार नाहीत. आज उद्योगपती, व्यापारी, शेतकरी, जमीनदार हे सर्व वर्ग अधिक मगरूर झाले आहेत. तेच इथल्या राजकीय हालचाली dictate करताहेत आणि या वर्गांची राजकारणावरील पकड गेल्या दहा वर्षांत अधिकच वाढली आहे. पटेल–नेहरूंच्या काळात state power ला जे स्वतंत्र, स्वायत्त स्वरूप होते ते आज लोपले आहे. थोडक्यात सांगायचे तर, मतांचे गठ्ठे मिळविण्याच्या Strategies जोपर्यंत बदलत नाहीत तोपर्यंत फारसे काहीच बदलणार नाही.

'असा एक दावा शरद पवारांच्या पाठिराख्यांकडून केला जातो की, खरीखुरी लोकशाही आली तर इंदिरा गांधींच्या लोकशाहीविघातक कारवायांना आळा बसेल, संघ–जनसंघाचे वर्चस्व कमी होईल. असा दावा करणे हा एक तर भाबडेपणा आहे किंवा सामान्य जनतेच्या डोळ्यांत केलेली धूळफेक आहे. उलट हे गट केव्हाही मात करून जातील, ही खरी भीती यांच्या मनात आहे. 'आता हा एक तिसरा पर्याय निर्माण होतोय,' ही आशाही mischievous आहे. स्वतःवर पुरोगामीपणाचा शिक्का मारून घेणारे हे लोक जनसंघीयांपेक्षा काही निराळे राजकारण करीत आहेत, असे मला वाटत नाही. अन्यथा शरद पवारांनी ही हातमिळवणी केलीच नसती. याचे कारण एकच आहे आणि ते म्हणजे खऱ्याखुऱ्या strategies च्या दृष्टीने कोणत्याही राजकीय पक्षाजवळ आज वेगळा व्यूह नाही, वेगळे धोरण नाही, वेगळा कार्यक्रम नाही.

'आज कॉंग्रेसची महाराष्ट्रातील निरंकुश सत्ता तुटल्याचा आनंद काही गटांना होतोय; पण त्याचबरोबर आपल्याला या सर्व प्रकरणात बनवलं तर गेलं नाही ना, अशी भीतीही काही ठिकाणी व्यक्त होताना दिसते. या घटनेचे उत्साहाने स्वागत दोन कारणांमुळे होताना दिसते. त्यातील एक कारण म्हणजे इंदिराजींबद्दलचा अंधद्वेष आणि दुसरे कारण म्हणजे आपल्या मित्रमंडळाचा गोतावळा सत्तेवर आल्याचा आनंद. ही मक्तेदारी तुटली हे एका दृष्टीनं बरं झालं. कारण त्यामुळे प्रवाह मोकळा होतो. पण deeper level वर जर विचार केला तर असं लक्षात येतं की, ही मक्तेदारी अजून तुटलेलीच नाही. कारण ही मक्तेदारी म्हणजे यशवंतराव चव्हाण किंवा तत्सम व्यक्तीचीच मक्तेदारी होती. त्या दृष्टीने विचार केला तर ही मक्तेदारी अजूनही तुटलेलीच नाही. Deeper level वरही ही मक्तेदारी तेव्हाच तुटली असती जेव्हा धनिक शेतकरी किंवा काळा बाजारवाले यांची हुकमत संपली असती; पण तसं झालेलं नाही. त्यामुळे लौकिक अर्थाने जरी ही मक्तेदारी फुटली असली तरी जोपर्यंत या कोंडीच्या किल्ल्या शरद पवार आणि राजारामबापूंच्या हाती आहेत तोपर्यंत ही मक्तेदारी संपलेली आहे, असं म्हणता येणार नाही.

'जनता पक्षाबद्दल बोलायचं झालं तर १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाने जो विजय संपादन केला त्यामधून या पक्षाबद्दल कमालीचं प्रेम, आकर्षण, विश्वास निर्माण झाला; एक सच्चं लोकमत प्रगट झालं. त्या वेळीही इथल्या जनतेच्या काही फार मोठ्या अपेक्षा होत्या असं मला वाटत नाही. गेल्या तीस वर्षांपेक्षाही शुद्ध शासन मिळावं, लोकहिताच्या योजना या शासनाने अधिक प्रामाणिकपणाने राबवाव्यात, एवढीच जनतेची त्यांच्याकडून अपेक्षा होती. जनतेने जेव्हा जयप्रकाशजींनाही पाठिंबा दिला तेव्हाही तो संपूर्ण क्रांतीच्या आशेने दिला नाही, तर त्याच तऱ्हेच्या संकेतांना बांधलेले सरकार अधिकारावर येईल अशी आणि एवढीच माफक आशा त्या पाठीमागे होती. पण त्या दृष्टीने खरोखरच महत्त्वपूर्ण अशी पावलं जनता सरकारला टाकता आली नाहीत. सध्या जनता पक्षाने महाराष्ट्रात शरद पवारांबरोबर जी युती केली आहे, त्यामुळे त्या पक्षाची प्रतिमा कलुषित होईल, असं मला वाटत नाही. या नव्या सरकारने जर निराळा कार्यक्रम दिला, किमान भ्रष्टाचार थांबविण्याचा प्रयत्न जरी केला तरी या घटनेचं स्वागत होईल.

'या नव्या बनावामुळे किंवा त्यातून पुढे निर्माण होणाऱ्या पेचप्रसंगामुळे इंदिरा कॉंग्रेस बळकट होईल काय, हे आता नक्की सांगता येणार नाही. पण ही अधोगती जर अशीच होत राहिली आणि निर्माण होणाऱ्या नैतिक आणि राजकीय पोकळीचा फायदा जर कोणत्याच उजव्या किंवा डाव्या गटांना उठविता आला नाही तर ही धूर्त बाई, मीच कायदा आणि सुव्यवस्था आणू शकते आणि प्रभावी शासन देऊ शकते, असा दावा करून परिस्थितीचा फायदाही उठवील आणि मग अशा वेळी इंदिराजींवरील प्रेमापोटी नव्हे, पण कायदा आणि सुव्यवस्थेच्या आशेपोटी समाजाचा फार मोठा सेक्शन इंदिराजींच्या मागे उभा राहण्याची शक्यता आहे. थोडक्यात सांगायचं तर—' I don't rule her out.'

'अशा तऱ्हेच्या पक्षीय सुंदोपसुंदीपेक्षा राष्ट्रपति राजवट यावी हे मला पसंत नाही. पुन्हा एकदा सार्वमत घ्यावं, असं म्हणणं हे सुद्धा सवंग घोषणेचं वरकरणी radical वाटणारं स्वरूप आहे. कारण असं जर नेहमी करीत राहिलं तर राज्यकारभार करणंच कठीण होऊन बसेल. कारण अशा तऱ्हेच्या coalitional politicsला सुरुवात झाली आहे आणि ही गोष्ट आता कायमचीच होऊन बसणार आहे. तेव्हा आता येणाऱ्या कोणत्याही सरकारकडून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे निकष लावणंच सर्वांत महत्त्वाचं आहे. इथून पुढे येणारं कोणतंही सरकार कसं बनतं, यापेक्षाही ते कोणत्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करू शकतं, याला अधिक महत्त्व दिलं गेलं पाहिजे. तसंच अशा प्रकारच्या राज्यपद्धतीला पर्यायी हुकूमशाही होऊ शकत नाही. तर अन्याय होणाऱ्या दलित लोकांची जागृती करून त्यांना संघटनात्मक पाठबळ निर्माण करणं हेच इथून पुढल्या काळात अधिक उचित ठरेल. म्हणजेच Ideological Politics करण्याची वेळ आता आली आहे.'

—संकलन : सतीश कामत.